cmyk

दैनिक www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव ● लातुर जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–६ | अंक–१४७ | सोमवार दि.१७ ऑगस्ट २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/858 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## थोडक्यात...

### सरकारची भूमिका ओबीसीविरोधी–वडेट्टीवार

मुंबई : मराठा आरक्षणाच्या मागणीच्या पार्श्वभूमीवर राज्यातील ओबीसी आरक्षणाचा मुद्दा पुन्हा तापला आहे. मराठा आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाबाबत चर्चा सुरू असतानाच काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी ओबीसींच्या प्रश्नावरून राज्य सरकारवर जोरदार हल्ला केला. जातनिहाय जनगणनेच्या संदर्भात बोलताना वडेट्टीवार यांनी काही नेत्यांकडून करण्यात आलेल्या दाव्यावर प्रश्न उपस्थित केला. केवळ जनगणनेत जात लिहिली गेल्याने अर्धी लढाई जिंकली असे म्हणता येणार नाही, असे ते म्हणाले. ‘जात लिहिल्याबरोबर अर्धी लढाई कशी जिंकली? हे मला कळलं नाही. जर त्यामध्ये ओबीसीचा स्वतंत्र कॉलम असता, तर त्यातून १०० टक्के यश मिळाले असते’ असे वडेट्टीवार यांनी म्हटले. जात लिहिण्याबरोबरच त्यातील विविध पोटजाती आणि वेगवेगळ्या राज्यांमध्ये जातींची नोंद कशा पद्धतीने केली जाते, याचाही विचार करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

### ‘वंदे मातरम’ बद्दल भाजपाने काँग्रेसला शिकवू नये

मुंबई : प्रसार माध्यमांशी बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, वंदे मातरम राष्ट्रगितावरून भारतीय जनता पक्ष राजकारण करत आहे हे अत्यंत हास्यास्पद आहे. वंदे मातरम हे १८९६ मध्ये भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या कलकत्ता अधिवेशनात पहिल्यांदा गायले गेले व तर २४ जानेवारी १९५० रोजी ते देशाचे राष्ट्रीयगीत म्हणून स्वीकारण्यात आले. गुरुदेव रविंद्रनाथ टागोर, पंडित जवाहरलाल नेहरू, सरदार वल्लभाई पटेल, सुभाषचंद्र बोस, मौलाना आझाद यांच्या उपस्थितीत याचा निर्णय झालेला असून काँग्रेसच्या प्रत्येक अधिवेशनात व कार्यक्रमात ते गायिले जाते. भारतीय जनता पक्षाकडून एक व्हिडिओ प्रसारित करून काँग्रेसविरोधात अपप्रचार केला जात आहे. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जून खरगे यांना जास्त वेळ उभा राहता येत नाही ये लक्षात घेऊन सोनियाजी गांधी काही सुचना करत आहेत परंतु भाजपा कडून मात्र वंदे मातरमचा अपमान केल्याचा अपप्रचार केला जात आहे, हा अपप्रचार थांबवावा. वंदे मातरम बद्दल भाजपाने काँग्रेसला शिकवण्याची गरज नाही, असेही ते म्हणाले.

### १०६ हुतात्म्यांना मानाचे स्थान

मुंबईः संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी हौतात्म्य पत्करलेल्या १०६ हुतात्म्यांचे चिरंतन स्मरण व्हावे, यासाठी महाराष्ट्र शासनाने ताब्यात घेतलेल्या एअर इंडियाच्या नव्या प्रशासकीय इमारतीच्या दर्शनी भागात या सर्व हुतात्म्यांची नावे ठळकपणे आणि सन्मानपूर्वक प्रदर्शित करण्याच्या प्रस्तावावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सकारात्मक भूमिका घेतली आहे. याबाबत मुख्यमंत्री फडणवीस यांनी राज्याच्या मुख्य सचिवांना आवश्यक ती कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत. सांस्कृतिक कार्य मंत्री अँड. आशिष शेलार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र पाठवून ही मागणी केली होती. संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी झालेल्या ऐतिहासिक आंदोलनात १०६ आंदोलकांनी आपल्या प्राणांची आहुती दिली. त्यांच्या बलिदानामुळे महाराष्ट्राची निर्मिती झाली असून, या हुतात्म्यांचे योगदान महाराष्ट्राच्या इतिहासात अजरामर आहे, असे अँड. शेलार यांनी पत्रात नमूद केले होते.

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती,**

बीड, दि.१३ ऑगस्ट २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ७४.५० क्विंटल | २,५९० | २,८०० | २,६५३ |
| ज्वारी/हायब्रिड: ८३.०० क्विंटल | २,००० | ४,२८० | २,८९० |
| मका/लोकल: ५.०० क्विंटल | २,४५३ | २,४५३ | २,४५३ |
| तूर : २.५० क्विंटल | ६,७५० | ७,००० | ६,८७५ |
| उडीद : २.०० क्विंटल | ५,००० | ५,००० | ५,००० |
| बाजरी: ९३.०० क्विंटल | २,२०० | २,८०० | २,६२० |
| मुग: ४१.५० क्विंटल | ५,८०० | ५,८१२ | ५,८०६ |
| सोयाबीन: १०.०० क्विंटल | ६,८०० | ६,८०० | ६,८०० |
| हरभरा: १२.५० क्विंटल | ५,१०० | ६,००१ | ५,४९४ |

# शेतकऱ्यांचा दिल्लीकडे कूच करण्याचा इशारा

## खनौरी बॉर्डर सील, हरियाणा पोलिसांकडून बॅरिकेडिंग

दिल्ली । वृत्तसंस्था

**भारत–अमेरिका ट्रेड डीलच्या विरोधात शेतकऱ्यांनी पुन्हा एकदा दिल्लीकडे कूच करण्याची घोषणा केली आहे. हे लक्षात घेता खनौरी–दातासिंहवाला बॉर्डर सील करण्यात आली असून, पोलिसांनी बॅरिकेडिंग केली आहे.**

पंजाबचे शेतकरी नेते जगजीत सिंह डल्लेवाल यांच्या नेतृत्वाखाली होणाऱ्या या पदयात्रेच्या पार्श्वभूमीवर जींदमधील खनौरी–दातासिंहवाला बॉर्डर सील करण्यात आली आहे. शेतकऱ्यांना दिल्लीच्या दिशेने पुढे जाण्यापासून रोखण्यासाठी पोलिसांनी रस्त्यांवर बॅरिकेडिंग, मोठे दगड आणि कंटेनर लावले आहेत. जगजीत सिंह डल्लेवाल यांच्या नेतृत्वाखाली संयुक्त किसान मोर्चा (गैर–राजकीय) यांनी १६ ऑगस्टपासून ‘किसान बचाओ पदयात्रा’ सुरू करण्याची घोषणा



केली. भारत–अमेरिका ट्रेड डीलच्या विरोधात काढण्यात येणारा हा पायी मोर्चा दातासिंहवाला येथून २९ ऑगस्टला दिल्लीतील जंतर–मंतरवर पोहोचणार आहे. शेतकऱ्यांच्या या २२८ किलोमीटर लांबीच्या मार्चच्या पार्श्वभूमीवर हरियाणा पोलिसांनी खनौरी बॉर्डरवर सुरक्षेचे कडक उपाय केले आहेत. व्हिडिओमध्ये पोलिसांनी बॉर्डरवर बॅरिकेडिंग आणि कंटेनर लावून संपूर्ण मार्ग कसा बंद केला आहे, हे पाहायला मिळत आहे. खनौरी–दातासिंहवाला सीमेवर हरियाणाच्या दिशेने जाणारा मार्ग बंद करण्यात आला आहे. पोलिसांनी येथे पाच थरांची बॅरिकेडिंग केली आहे. रस्त्यावर कंटेनर तसेच मोठे दगड ठेवण्यात आले आहेत, त्यामुळे वाहतुकीवर ▶▶ पान २ वर

# आता आमच्या बाया चपला काढतील-मनोज जरांगे

## २९ ऑगस्टला होणाऱ्या अनोदालनात जीव गेला तरी चालेल पण आंदोलनावर ठाम

जालना । प्रतिनिधी

मराठा समाजातील अभ्यासकांची महत्त्वाची बैठक पार पडल्यानंतर पत्रकारांशी बोलताना जरांगे पाटील यांनी राज्य सरकार आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला. मराठ्यांपुढे सत्तेचे शहाणपण जमत नाही, आता आमच्या बाया चपला काढतील, असा घणाघात मनोज जरांगे यांनी केला. यावेळी बोलताना मनोज जरांगे पाटील यांनी २९ ऑगस्टला होणाऱ्या अनोदालनात जीव गेला तरी चालेल पण आंदोलनावर ठाम



असल्याचा निर्धार केला आहे.

अभ्यासकांच्या बैठकीविषयी बोलताना मनोज जरांगे पाटील म्हणाले की, जेवढे मराठ्यांचे अभ्यासक आले होते त्यांच्याशी चर्चा केली. हैदराबाद गॅझेटिअरनुसार काय बदल करायचा आणि सातारा, कोल्हापूर, पुणे आणि बॉम्बे गॅझेटिअरनुसार जीआर कसा काढायचा यावर साधक–बाधक चर्चा झाली. मी ५८ लाख नोंदींचे प्रमाणपत्र घेणार. नोंदी मी शोधलेल्या नाहीत, सरकारने शोधल्या आहेत. ज्यांचे प्रमाणपत्र निघाले त्यांची व्हॅलिडीटी मिळाली पाहिजे. हैदराबाद गॅझेटिअरनुसार मराठवाड्यात संख्येच्या प्रमाणाप्रमाणे प्रमाणपत्र दिले आहेत. याशिवाय अण्णासाहेब पाटील विकास महामंडळाच्या ज्यांचे व्याज परतावे मिळाले नाहीत त्यांना ते देण्यात यावेत, अशी मागणीही त्यांनी केली. मनोज जरांगे पुढे म्हणाले की, नसरापूर घटनेचा निकाल लवकर लागू शकतो, मग तसा मालेगावच्या लेकीचा निकाल का नाही लागला? संतोष देशमुख, महादेव मुंडे यांची क्रूर हत्या झाली, तिथंपर्यंत निकाल का जात नाही? बावनकुळे आणि शिरसाट प्रमाणपत्र रद्द करत आहेत का? हस्तक्षेप करता ▶▶ पान २ वर

# राज्यात १,४४० डॉक्टरांची नियुक्ती लवकरच-आरोग्यमंत्री

मुंबई । प्रतिनिधी

**राज्यात येत्या काही दिवसांत १,४४० डॉक्टरांची नियुक्ती करण्यात येणार आहे. तसेच आणखी ६०० डॉक्टरांसाठी जाहिरात काढण्यात आली आहे. सुमारे २५० दंतचिकित्सकही लवकरच आरोग्य सेवेसाठी उपलब्ध होतील, अशी माहिती आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिली. आरोग्य व्यवस्था अधिक बळकट करण्यासाठी निधीची कमतरता भासू दिली जाणार नाही, असेही त्यांनी सांगितले.**

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या महिला आरोग्य समिती, जन आरोग्य समिती आणि रुग्णकल्याण समितीच्या सदस्यांशी आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी ऑनलाइन पद्धतीने ‘जन आरोग्य संवाद’ साधला. यावेळी त्यांनी आरोग्य समित्यांच्या माध्यमातून आतापर्यंत सहा लाखांहून अधिक नागरिकांशी ▶▶ पान २ वर

# ‘मुंडे जर काँग्रेसमध्ये आले असते तर त्यांचा जीव वाचला असता’-संजय राऊत

मुंबई । प्रतिनिधी

गोपीनाथ मुंडे काँग्रेसमध्ये आले असते तर त्यांचे प्राण वाचले असते, असे खळबळजनक विधान संजय राऊत यांनी केले आहे. या वक्तव्यामुळे राजकारण तापण्याची शक्यता वर्तवली जात आहे. भाजपमध्ये असताना त्यांना छळ सहन करावा लागला होता. मानसिकदृष्ट्या सतत त्रास दिला जात होता आणि मानसिक आघातही केले



जात होते, असा गंभीर दावाही संजय राऊत यांनी केला आहे.

राज्याचे माजी मुख्यमंत्री आणि काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते पृथ्वीराज चव्हाण यांनी दिवंगत भाजप नेते गोपीनाथ मुंडे काँग्रेसमध्ये येणार होते, असा गौप्यस्फोट केला आहे. या गौप्यस्फोटानंतर भाजप नेत्या आणि गोपीनाथ मुंडे यांच्या कन्या मंत्री पंकजा मुंडे प्रतिक्रिया देत आता यावर चर्चा करून काय उपयोग आहे आता ते हयात नाहीत, असे म्हटले होते. ‘‘मला जे माझे वडील समजले, ते या कमळातच जन्मले आणि कमळातच विसावले, हाच त्यांचा खरा राजकीय प्रवास ▶▶ पान २ वर

# दुष्काळमुक्त महाराष्ट्राचा संकल्प पूर्ण करणार–मुख्यमंत्री फडणवीस

मुंबई । प्रतिनिधी

विकसित भारताच्या संकल्पनेत महाराष्ट्राची भूमिका अत्यंत महत्त्वाची असून महाराष्ट्र हे देशाच्या विकासाचे ‘ग्रोथ इंजिन’ आहे. महाराष्ट्राचा विकास करताना शेवटच्या घटकापर्यंत विकास पोहोचविण्यासोबतच महाराष्ट्राला कायमस्वरूपी दुष्काळमुक्त करण्याचा राज्य शासनाचा



संकल्प आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे केले. स्वातंत्र्यसंग्राम सेनानी, क्रांतिकारक तसेच देशाच्या सीमांचे रक्षण करणाऱ्या जवानांना अभिवादन करून मुख्यमंत्र्यांनी राज्यातील जनतेला स्वातंत्र्यदिनाच्या शुभेच्छा दिल्या.

मंत्रालय येथे भारताच्या ८० व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त झालेल्या मुख्य शासकीय समारंभात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले, याप्रसंगी ते बोलत होते. मुख्यमंत्री फडणवीस ▶▶ पान २ वर

# २२ ऑगस्टला पुण्यामध्ये ‘विद्यार्थ्यांचा आवाज’ कार्यक्रम

## काँग्रेस नेते राहुल गांधी राहणार उपस्थित

पुणे । प्रतिनिधी

काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या ‘विद्यार्थ्यांचा आवाज’ अभियानाचा पुढील कार्यक्रम २२ ऑगस्ट रोजी पुण्यात होणार आहे. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांच्या प्रश्नांसोबतच विद्यार्थिनींचे हक्क, सुरक्षा, समानता आणि संधी या मुद्द्यांवरही चर्चा होणार आहे.

राहुल गांधी यांनी देशातील विद्यार्थ्यांना या अभियानाशी जोडण्याचे आवाहन केले आहे. देशातील मुलींना समानता, सुरक्षितता, संधी आणि स्वतःचे निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य मिळणे आवश्यक आहे. मात्र, त्यांना असुरक्षितता आणि भेदभावाचा सामना करावा लागत असून, आपल्या हक्कांसाठी दीर्घकाळ प्रतीक्षा करावी लागत असल्याचे राहुल गांधी यांनी म्हटले आहे. यापूर्वी प्रयागराज येथे ‘विद्यार्थ्यांचा आवाज’ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. ▶▶ पान २ वर

# एवढ्या दिवस काय गोट्या खेळत होते का?

● चाकण एमआयडीसीमध्ये उदय सामंत यांनी बैठक घेतल्यानंतर आ.रोहित पवारांची खोचक सवाल

मुंबई । प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी उद्योगमंत्री उदय सामंत यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला आहे. उदय सामंत यांनी चाकण एमआयडीसीत राजकारण आणण्याचा प्रयत्न काही जणांनी केल्याची टीका केली होती.



रोहित पवार यांनी या टीकेला जोरदार प्रत्युत्तर दिले. उदय समंत राजकीय उद्योगात जास्त बिझी असतात त्यामुळे एमआयडीसीतील लोकांसाठी काय केल ते सांगावे, असा सवाल रोहित पवार यांनी केला. चाकण एमआयडीसीत रविवारी जाऊन बैठक घेतली. आम्ही आधी गेलो, विषय मांडला आणि आता रविवारी आपण तिथ गेला आहात. उद्योजकांनी प्रेस घेतल्याने गडबड झाली मग तुम्ही रविवारी ▶▶ पान २ वर

# हायकोर्ट लिपिक परीक्षा गोंधळाविरोधातील ठिय्या आंदोलनात अभिजीत दीपके सहभागी



संभाजीनगर । प्रतिनिधी

हायकोर्टाच्या लिपिक परीक्षेत मोठ्या प्रमाणावर तांत्रिक गोंधळ झाल्याचा आरोप करत परीक्षार्थींनी रविवारी (दि. १६ ऑगस्ट) संभाजीनगर येथे आक्रमक पवित्रा घेतला. या ठिय्या आंदोलनात कॉकरोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजीत दीपके सहभागी झाले आहेत. ‘‘जोपर्यंत विद्यार्थ्यांच्या सर्व मागण्या मान्य होत नाहीत, तोपर्यंत आंदोलनस्थळावरून हलणार नाही, आता हेच आपलं जंतर-मंतर!‘‘ असा निर्धार अभिजीत दीपके यांनी व्यक्त केला आहे.

परीक्षार्थींनी सांगितले की, हायकोर्टाची लिपिक परीक्षा ऑनलाईन होती. परीक्षा केंद्रांवर ऑनलाईन परीक्षेदरम्यान अचानक सर्व्हर ठप्प झाले. अनेक संगणकांचे कीबोर्ड आणि माऊस योग्य प्रकारे काम करत नव्हते. परीक्षा सुरू झाल्यानंतर अवघ्या १० मिनिटांत सर्व यंत्रणा कोलमडली. ‘‘जर योग्य ऑनलाईन परीक्षा घेता येत नव्हती, तर आधीच सर्व तयारी का केली नाही?‘‘ असा थेट सवाल आंदोलनकर्त्यांनी उपस्थित केला आहे. आंदोलनाला पाठिंबा देताना अभिजीत दीपके म्हणाले, ‘‘तुम्ही शांततेच्या मार्गाने आंदोलन करत असाल तर मी शेवटपर्यंत तुमच्यासोबत असेन.‘‘ प्रशासकीय भोंगळ कारभारामुळे ही वेळ आल्याचे सांगत, ‘‘यात विद्यार्थी नापास झाले नसून, सरकार नापास झाले आहे. ऑनलाईन परीक्षा घेण्याची पात्रता ▶▶ पान २ वर

# शाहरूख खान, अजय देवगणसह टायगर श्रॉफला तुकाराम मुंडेंची नोटीस

## पानमसाल्याचे जाहिरातीद्वारे दिशाभूल करणारे प्रमोशन भोवले

मुंबई । प्रतिनिधी

जाहिरातीद्वारे अप्रत्यक्षपणे पानमसाल्याचे प्रमोशन केल्याप्रकरणी महाराष्ट्राच्या अन्न आणि औषध प्रशासनाने बॉलिवूड अभिनेते शाहरूख खान, अजय देवगण आणि टायगर श्रॉफ यांना कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. अन्न सुरक्षा आयुक्त तुकाराम मुंडे यांनी ही कारवाई केली असून, तिन्ही अभिनेत्यांना यावर १५ दिवसांत उत्तर देण्याचे निर्देश दिले आहेत.



महाराष्ट्रात पानमसाल्याच्या उत्पादन, साठवणूक, वितरण आणि विक्रीवर पूर्णपणे बंदी आहे. असे असताना २०२४ मध्ये या तिन्ही अभिनेत्यांनी एका पानमसाला कंपनीच्या उत्पादनाच्या जाहिरातीत एकत्र काम केले होते. अन्न सुरक्षा प्रमुख तुकाराम मुंडे यांनी ९ पानांची नोटीस जारी केली आहे. या नोटीसमध्ये तिन्ही अभिनेत्यांना या मोहिमेतील आपला सहभाग तात्काळ थांबवण्याचे आणि अधिकृत सोशल मीडिया खात्यांवरून या जाहिरातीशी संबंधित सर्व प्रमोशनल कंटेंट काढून टाकण्याचे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत. तुकाराम मुंडे यांनी नोटीसमध्ये नमूद केले आहे की, प्राथमिक पाहणीत असे दिसून येते ▶▶ पान २ वर

cmyk

२ राज्य लोकतंत्र संपादकीय.... सोमवार दि.१७ ऑगस्ट २०२६

## अग्रलेख

# मताच्या अधिकाराआधीच रस्त्यावर उतरलेले विद्यार्थी

# आरसा फोडण्यापेक्षा चेहरा बदलण्याची गरज !

देशातील राजकारणात ' जेन झी'च्या आंदोलनांची चर्चा सुरू असतानाच आता त्यापेक्षाही लहान वयातील जनरेशन अल्फा रस्त्यावर उतरू लागली असेल, तर हा केवळ आंदोलनांचा विस्तार नाही; हा देशाच्या शिक्षणव्यवस्थेला मिळालेला गंभीर इशारा आहे. उत्तर प्रदेश, बिहार, राजस्थान, मध्य प्रदेश आणि महाराष्ट्रातील शाळकरी मुलांनी शिक्षकांची कमतरता, वर्गखोल्या, ग्रंथालये, स्वच्छतागृहे, पिण्याचे पाणी, वीज, सुरक्षित रस्ते, शिष्यवृत्ती आणि वाहतूक यांसारख्या मूलभूत प्रश्नांसाठी आवाज उठवणे ही प्रशासनासाठी लाजिरवाणी बाब आहे.

ज्यांच्या हातात अजून मतदानाचा अधिकार आलेला नाही, ज्यांना निवडणुकीत सरकार निवडता येत नाही, अशी मुले जर शाळेची दारे बंद करून रस्त्यावर उतरली, वाहतूक रोखली आणि प्रशासनाला जाब विचारू लागली, तर प्रश्न या मुलांच्या शिस्तीचा नसून व्यवस्थेच्या संवेदनशीलतेचा आहे. शाळेत शिक्षक नाहीत, तर शिक्षण कसे होणार? वर्गखोली अपुरी असेल, तर विद्यार्थ्यांनी कुठे बसायचे? मुलींसाठी स्वतंत्र आणि सुरक्षित स्वच्छतागृह नसेल, तर 'बेटी बचाओ, बेटी पढाओ'च्या घोषणा कशासाठी? पिण्याचे स्वच्छ पाणी आणि वीज उपलब्ध नसेल, तर डिजिटल शिक्षणाच्या गप्पा कशासाठी? शिष्यवृत्ती वेळेवर मिळत नसेल, तर गरीब विद्यार्थ्यांनी शिक्षणाचा खर्च कसा भागवायचा? हे प्रश्न मुलांनी निर्माण केलेले नाहीत; हे प्रश्न प्रशासनाच्या अपयशातून निर्माण झाले आहेत. विशेष म्हणजे, या आंदोलनांमागील मागण्या कोणत्याही मोठ्या राजकीय घोषणेपेक्षा अधिक मूलभूत आहेत. शिक्षकांच्या रिक्त जागा भरा, अनावश्यक बदल्या थांबवा, वर्गखोल्या बांधा, ग्रंथालये सुरू करा, स्वच्छतागृहे द्या, पाणी आणि वीज द्या, शिष्यवृत्ती वेळेवर द्या आणि शाळेत जाण्यासाठी परवडणारी वाहतूक उपलब्ध करा. इतक्या साध्या मागण्यांसाठी मुलांना रस्त्यावर यावे लागणे हेच शिक्षणाच्या अधिकाराचीच विडंबना आहे. आजची जनरेशन अल्फा माहितीच्या युगात वाढत आहे. मोबाईल, इंटरनेट आणि सोशल मीडियामुळे त्यांना देशातील एका भागात घडणारी घटना दुसऱ्या क्षणी समजते. त्यामुळे आपल्या शाळेची अवस्था आणि इतरत्र उपलब्ध असलेल्या सुविधा यातील फरकही त्यांच्या लक्षात येतो. पूर्वी विद्यार्थी प्रश्न विचारत नसत, सहन करत असत. आजची पिढी मात्र 'का?' हा प्रश्न विचारते. आणि हा प्रश्न प्रशासनाला सर्वाधिक अस्वस्थ करणारा आहे. महाराष्ट्रासारख्या प्रगत राज्यातही शाळांच्या मूलभूत सुविधांबाबत प्रश्न उपस्थित होत असतील, तर केवळ मोठमोठ्या शैक्षणिक योजना जाहीर करून उपयोग नाही. शाळांच्या इमारतींची छायाचित्रे, डिजिटल वर्गांच्या उद्घाटनांचे सोहळे आणि कागदावरील आकडे यापेक्षा विद्यार्थ्यांच्या प्रत्यक्ष अनुभवाला महत्त्व द्यावे लागेल. विद्यार्थ्यांनी रस्त्यावर उतरणे योग्य की अयोग्य, यावर प्रशासनाने वाद घालण्यात वेळ घालवू नये. वाहतूक रोखणे किंवा शाळा बंद पाडणे योग्य नाही, हे निश्चित. मात्र आंदोलनाची पद्धत चुकीची म्हणून मागण्याही चुकीच्या ठरवणे हा त्याहून मोठा अन्याय ठरेल. मुलांनी शाळेच्या मूलभूत सुविधांसाठी आंदोलन करण्याची वेळच का आली, याचे उत्तर आधी प्रशासनाने द्यावे. आज जेन झी प्रश्न विचारत आहे; उद्या जनरेशन अल्फा त्याच प्रश्नांना अधिक तीव्रतेने सामोरे जाईल. या पिढीला फक्त परीक्षा, गुण आणि प्रमाणपत्रे नकोत. त्यांना सुरक्षित, सक्षम आणि सन्मानजनक शिक्षण हवे आहे. म्हणून सरकारने या आंदोलनांकडे कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न म्हणून न पाहता, तर शिक्षणव्यवस्थेच्या आरोग्याचा 'रेड अलर्ट' म्हणून पाहिले पाहिजे. प्रत्येक जिल्ह्यात शाळानिहाय मूलभूत सुविधांचे तातडीने ऑडिट झाले पाहिजे. शिक्षकांची रिक्त पदे भरली पाहिजेत. शिष्यवृत्तीची रक्कम वेळेत मिळाली पाहिजे. मुलींसाठी सुरक्षित स्वच्छतागृहे, पिण्याचे पाणी, वीज आणि सुरक्षित रस्ते ही सुविधा नव्हे तर हक्क आहेत. कारण आज रस्त्यावर उतरलेली ही मुले केवळ स्वतःसाठी प्रश्न विचारत नाहीत. ती उद्याच्या भारताच्या शिक्षणव्यवस्थेला आरसा दाखवत आहेत. हा आरसा फोडण्यापेक्षा त्यात दिसणारा चेहरा बदलण्याची गरज आहे!

# मंगेशजी चिवटे -बाजीराव चव्हाण यांची आरोग्यसेवेची हाक..

## वाढदिवसानिमित्त मोफत आरोग्य शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद..

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री मा. ना. श्री. एकनाथ शिंदे साहेब आणि ज्ञानविजय बाजीराव चव्हाण यांच्या संयुक्त वाढदिवसानिमित्त तसेच स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून लहान मुलांसाठी मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले. मंगेशजी चिवटे उपमुख्यमंत्री शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष प्रमुख, बाजीराव दादा चव्हाण यांच्या संकल्पनेतून व पुढाकारातून आयोजित करण्यात आलेल्या या शिबिरात बालकांची २- इको तपासणी तसेच हृदयविकारासंदर्भातील शस्त्रक्रिया व उपचारासाठी आवश्यक वैद्यकीय मार्गदर्शन करण्यात आले. या शिबिरादरम्यान उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब यांनी ज्ञानविजय बाजीराव चव्हाण यांना दूरध्वनीवरून वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. तसेच तपासणीसाठी आलेल्या बालकांशी संवाद साधत त्यांच्या आरोग्याची विचारपूस केली.



यावेळी प्रकाश आबिटकर साहेब यांनीही ज्ञानविजय बाजीराव चव्हाण यांना दूरध्वनीवरून वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. तसेच शिबिरासाठी आलेल्या लहान मुलांशी संवाद साधून त्यांच्या आरोग्याची माहिती घेतली. शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाचे प्रमुख मंगेश चिवटे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि बाजीराव दादा चव्हाण यांच्या पुढाकारातून हा उपक्रम पार पडला. शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष, श्रीकांत शिंदे फाउंडेशन आणि ज्युपिटर हॉस्पिटल यांच्या माध्यमातून शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. आर्थिक परिस्थितीमुळे अनेकदा बालकांच्या आरोग्य तपासण्या वेळेवर होत नाहीत. अशा गरजू व गरीब कुटुंबातील मुलांसाठी हे शिबिर महत्त्वपूर्ण ठरले. वेळेत २- इको तपासणी झाल्यामुळे संभाव्य हृदयविकाराचे निदान करण्यास मदत झाली असून, पालकांमध्ये बालकांच्या हृदयाच्या आरोग्याबाबत जनजागृती निर्माण झाली. वाढदिवसाचा आनंद सामाजिक उपक्रमातून साजरा करत गरजू बालकांच्या आरोग्यासाठी घेतलेला हा पुढाकार कौतुकास्पद असल्याची भावना पालकांनी व्यक्त केली. बाजीराव दादा चव्हाण यांच्या संकल्पनेतून राबविण्यात आलेल्या या आरोग्य उपक्रमाला पालक व नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

# संत सावता महाराज मंदिर परिसरात सभागृहासाठी भरीव निधी देणार

## पर्यावरण मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांची ग्वाही; बीडमध्ये संत सावता महाराज मंदिरात सत्कार

**बीड । प्रतिनिधी**

बीडमधील संत सावता महाराज मंदिर परिसरातील सभागृह, भव्य डोम तसेच आवश्यक पायाभूत सुविधांच्या विकासासाठी जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून दोन टप्प्यात भरीव निधी उपलब्ध करून देण्यात येईल, अशी ग्वाही पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी दिली.



बीड शहरातील संत सावता महाराज मंदिरात ट्रस्टकडून ना.पंकजाताई मुंडे यांचा रविवारी (दि.१६) सत्कार करण्यात आला. यावेळी त्या बोलत होत्या. याप्रसंगी माजी खासदार डॉ.प्रितमताई मुंडे, भाजप नेते डॉ.योगेश क्षीरसागर, बीड नगरपरिषदेच्या भाजप गटनेत्या डॉ.सारिकाताई क्षीरसागर, नगरसेवक शुभम धूत, सावित्री नितीन साखरे, ट्रस्टचे पदाधिकारी नामदेव दुधाळ, मोहन गोरे, शामसुंदर घाडगे, समता परिषद जिल्हाध्यक्ष निखिल शिंदे, शहराध्यक्ष नितीन राऊत, महात्मा फुले युवा दलाचे अध्यक्ष ॲड. सतीश शिंदे, दिनकर जमदाडे, सिताराम पानखडे, सचिन दुधाळ, रमेश दुधाळ, विष्णू यादव, महेश राऊत, बाळासाहेब धोत्रे, मंगेश जमदाडे, महेश चौधरे, संतोष गवळी, सुबोध शिंदे, छाया लांडगे, अलका राऊत, चित्रा घाडगे, आशा गोरे, मंदा राऊत, प्रियांका गोरे आदी उपस्थित होते. पुढे बोलताना ना.पंकजाताई मुंडे म्हणाल्या की, संत सावता महाराज मंदिराची पायाभरणी सुरू असताना आपण या ठिकाणी आले होते. मंदिरासाठीची जागा माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर आणि डॉ.भारतभूषण क्षीरसागर यांनी उपलब्ध करून दिली. आता मंदिर परिसराच्या विकासासाठी डॉ.योगेश क्षीरसागर हे पाठपुरावा करत आहेत. त्यांच्यासह सहकाऱ्यांनी भव्य डोमच्या बांधकामासह विविध सुविधांसाठी भरीव निधी उपलब्ध करून देण्याची मागणी केली आहे. समाजाची मागणी आणि मंदिर परिसराच्या विकासाची गरज लक्षात घेऊन जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून दोन टप्प्यांत भरीव निधीची तरतूद करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले. संत सावता महाराज मंदिर परिसराच्या विकासामुळे भाविकांसह समाजबांधवांना विविध सुविधा उपलब्ध होण्यास मदत होणार असून, समाजपयोगी उपक्रमांसाठी सभागृह उपयुक्त ठरणार आहे, असेही त्या म्हणाल्या. यावेळी विविध पक्ष व संघटनांचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### डॉ.क्षीरसागरांसह पदाधिकाऱ्यांनी मुंबईत भेटून दिले होते आमंत्रण

भाजप नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांच्यासह पदाधिकाऱ्यांनी काही दिवसांपूर्वी मुंबईत मंत्री पंकजाताई मुंडे यांची भेट घेऊन बीड शहरातील संत सावता महाराज मंदिराला भेट देण्याचे आमंत्रण दिले होते. त्यानुसार पंकजाताई मुंडे यांनी मंदिराला भेट देऊन सत्कार स्वीकारला. तसेच मंदिर परिसराच्या विकासासाठी आपण कटिबद्ध असल्याची ग्वाही त्यांनी दिली.

# संत विचाराचा परमार्थ केल्यास सचिदानंदाची प्राप्ती होते-ह.भ.प.मनीषाताई बिडाईत

**बीड । प्रतिनिधी**

सुखापासून दूर जाणारा प्रपंच आहे. प्रपंच्याच राहूनही परमार्थ करता येतो. दातृत्व असणाऱ्याकडे देवत्व असते. संत विचाराचा परमार्थ करावा. सचिदानंदाची प्राप्ती होते. असे प्रतिपादन ख्यातनाम कीर्तनकार ह.भ.प. मनीषाताई बिडाईत, छत्रपती संभाजीनगर यांनी केले.



बीड शहरातील राधाकृष्णनगरीमध्ये आयोजित वै.राधाकृष्ण गायकवाड पाटील यांच्या आठव्या पुण्यस्मरणार्थ आयोजित संगीत भागवतकथा व कीर्तन सोहळ्यात काल्याच्या कीर्तनात रविवारी ह.भ.प. मनीषाताई बिडाईत महाराज बोलत होत्या. 'उपजोनिया पुढती येऊ । काला खाऊ दहीभात ।।वैकुंठी तो ऐसे नाही । कवल कांहीं काल्याचे' ।। या संतश्रेष्ठ तुकाराम महाराज यांच्या अभंगावर त्यांनी श्रोत्यांना मंत्रमुग्ध करणारे कीर्तन केले. याप्रसंगी अभंगावर निरूपण करतांना ह.भ.प. मनीषाताई बिडाईत यांनी, काल्याचे तीन प्रकार आहेत. नाम रुपात्मक काला, हरिनाम खिचडी काला, आणि जीव- ब्रम्ह ऐक्याचा काला आहे. किर्तन किर्तनरुपी वाळवंटात काला होतो. प्रत्येकाने कीर्तन रुपी करावा, असे सांगून विविध दृष्टांत देवून कीर्तनात श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. वै. गायकवाड पाटील यांनी आयुष्यात स्वतःचे वाढदिवस साजरी न करता शहीद कुटुंबीयांच्या सहभाग घेऊन त्यांना मोठे सहाय्य केले असे सांगून ह.भ.प. प्रतिभाताई गायकवाड पाटील आणि त्यांचा परिवार करत असलेल्या आध्यात्मिक कार्याविषयी त्यांनी गौरवोद्गार काढले. यावेळी म्हणून हभप बंडू महाराज जटाळ, अशोक महाराज, खांडे महाराज, मृदंगाचार्य रामेश्वर जाधव महाराज आदींनी कीर्तनात साथसंगत केली. कीर्तन ह भ प मुक्तीराम महाराज खांडे, पत्रकार नारायण नागरे, माणिक खांडे यांच्यासह टाळकरी, परिसरातील भाविक व नागरिक मोठ्या संखेने उपस्थित होते.

# विलास घुले हत्याप्रकरणी २१ ऑगस्टला बीडमध्ये भव्य मोर्चा

**बीड । प्रतिनिधी**

**टाकळी तालुका केज येथील हॉटेल व्यवसायिक विलास घुले याची कट असून हत्या केल्याप्रकरणी सर्व आरोपींना अटक करण्यात यावी या मागणीसाठी २१ ऑगस्ट रोजी विलास घुले यांना न्याय मिळाला पाहिजे या मागणीसाठी बीडमध्ये भव्य मोर्चा काढण्यात येणार आहे आज झालेल्या बैठकीमध्ये हा निर्णय घेण्यात आला.**

विलास घुले या तरुणाची गट रचून हत्या करण्यात आली याप्रकरणी पुरवणी जवाब मध्ये खासदार बजरंग सोनवणे यांच्या मुलाचे नाव घेण्यात आले आहे त्याच्यासह इतरांना अटक करण्यात यावी याप्रकरणी अद्यापही प्रशासन गांभीर्याने घेत नाही १५ ऑगस्ट रोजी पालकमंत्री बीड जिल्ह्यात असताना स्वर्गीय विलास घुले याची पत्नी सुषमा घुले हिने आंदोलन स्थळी २० पिऊन आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला होता पोलिसांच्या सतर्कतेमुळे मोठा अनर्थ टळला असला तरी या घटनेनंतर संतप्त आंदोलन करते आणि नागरिकांनी रस्ता रोको आंदोलन करण्याचा प्रयत्न केला प्रामुख्याने या प्रकरणात राज्य सरकार आणि जिल्हा प्रशासन गांभीर्याने घेत नसल्याच्या आरोपानंतर आज झालेल्या बैठकीमध्ये २१ ऑगस्ट रोजी बीड जिल्हाधिकारी कार्यालयावर भव्य मोर्चा काढण्याचे आयोजन करण्यात आले आहे हा मोर्चा छत्रपती शिवाजी महाराज जिल्हा स्टेडियम येथून जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकणार आहे




**अंबडः उपविभागीय कार्यालयात स्वातंत्र्यदिन साजरा करण्यात आला यावेळी उपविभागीय अधिकारी उमाकांत पारधी, विभागीय पोलीस अधिकारी सिद्धेश्वर धुमाळ तहसीलदार सोमेश मोहिते, पोलीस निरीक्षक संतोष घोडके, पोलीस उपनिरीक्षक श्री ढाकणे, पोलीस उपनिरीक्षक भगवान नरोडे, कार्यालयीन अधीक्षक श्री कोमटवार श्री सपकाळ, श्याम विभोते यांच्यासह सर्व कर्मचारी अधिकारी पोलीस प्रशासन व पत्रकार यांची उपस्थिती होती.**



**जालना जिल्हाधिकारी कार्यालयाच्या मैदानात १५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला झेंडावंदन करताना पालकमंत्री पंकजा मुंडे जिल्हाधिकारी आशिमा मित्तल पोलीस अधीक्षक , अप्पर पोलीस अधीक्षक, सिंधू महापौर वंदना मगरे व इतर**

पान १ वरून...

## शेतकऱ्यांचा दिल्लीकडे कूच

निर्बंध आले आहेत. शेतकऱ्यांचा जमाव हरियाणात प्रवेश करून दिल्लीच्या दिशेने पुढे जाऊ नये, हा प्रशासनाचा प्रयत्न आहे. यासाठी बॉर्डरवर मोठ्या प्रमाणात पोलिसांचा बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. शेतकऱ्यांच्या मोर्चाची घोषणा झाल्यानंतर जींद प्रशासनाने रात्री उशिरापासून सीमेवरील सुरक्षा अधिक कडक केली. पोलिसांची संख्या वाढवण्यासोबतच मार्गही बंद करण्यात आला आहे. सध्या प्रशासनाचे संपूर्ण लक्ष बॉर्डरच्या सुरक्षेवर आहे. आगामी काळात बॉर्डरवरील परिस्थिती कशी राहते, यावर प्रशासनाची नजर आहे.

--------------

## राज्यात १,४४० डॉक्टरांची

संवाद साधण्यात आला आहे. भविष्यात आणखी चार लाख नागरिकांशी संवाद साधून त्यांच्या आरोग्यविषयक समस्या जाणून घेत त्या सोडविण्यात येणार असल्याचे आरोग्यमंत्री आबिटकर यांनी सांगितले. या संवादात आरोग्य समित्यांच्या बैठका नियमित होतात का, डॉक्टर वेळेवर उपस्थित राहतात का, डॉक्टरांचा रुग्णांशी योग्य संवाद होतो का आणि रुग्णालयांमध्ये आवश्यक सेवा उपलब्ध आहेत का, याची थेट माहिती घेण्यात आली. स्थानिक पातळीवरील अडचणी समजून घेऊन त्यावर तातडीने उपाययोजना करण्यावर भर दिला जाणार असल्याचं आबिटकर म्हणाले.

------------

## आता आमच्या बाया चपला

येत नाही तर बावनकुळे पत्र देतात कसे? हा मराठ्यांच्या नेत्यांचा अपमान आहे. तुमच्या शिंदेंच्या ऑफिसमध्ये गुपचुप करून येत आहेत, ते तुम्हाला मदत करणार नाहीत. त्यांना फडणवीस जवळ करत नाहीत. फडणवीसांनी जे ओबीसींचे नेते जवळ केलेत तेच केलेत, दुसऱ्यांना ते पायरी चढू देणार नाहीत. मराठ्यांचे शत्रू त्यांचा आश्रय कसे घेतात? मराठ्यांना चाणक्य नीती परळीच्या टोळीने शिकवली आहे. मी भुमरे मामाला सांगितले होते, तुमच्या राजकारणाने ओढतान होईल. शिरसाटने फोन करून प्रमाणपत्र रद्द करायला सांगितले, शिंदेंची ही चाल कोणती? मी समाजाच्या विरोधात काम करणाऱ्यांबरोबर बोलणार नाही. मी आत्तापर्यंत गोरगरीब ओबीसींना बोललो नाही. मी २९ ऑगस्टला सर्व विषय मार्गी लावणार आहे. फडणवीसांनी मराठ्यांचा रोष कशाला सरकारवर घेतो असे बावनकुळे यांना म्हणायला हवे. फडणवीस-शिंदे यांनी चूक दुरुस्त करावी, असे त्यांनी म्हटले. उदय सामंत आणि चंद्रशेखर बावनकुळे यांच्या फोनबाबत माहिती देताना जरांगे म्हणाले की, माझ्या आणि उदय सामंत यांच्या मोबाईलवर महिनाभर न उडायचे पॅकेज मारलेले आहे, मला फोन चालू आहेत, बावनकुळे यांचा फोन चार वेळेस आला होता. त्यांना काळजी म्हणता येत नाही, काडजी म्हणतात. आता मी व्यंगावर बोललो नाही. मी बावनकुळे यांना विचारले का रडले म्हणून, तर बावनकुळे म्हटले चूक दुरुस्त करतो म्हणून. बावनकुळे साहेब नाव ठेवणार नाही, पण चूक दुरुस्त करा. मनोज जरांगे पुढे म्हणाले की, शक्यतो सूत्रांची अशी माहिती आहे की मुंबईला अचानक आंदोलन होऊ शकते. आम्ही मुंबईला का नाही जायचे? देवेंद्र फडणवीस आमचे नाहीत, मग वर्षा बंगला आमचा नाही का? मी देवेंद्र फडणवीस यांच्या स्लॅबवर उपोषण करू शकतो, वर पाण्याची टाकी असेल ना, मी नळ बंद करणार नाही. हल्ल्याच्या भानगडीत फडणवीस यांनी पडू नये, आता आमच्या बाया चपला काढतील. सरकारंच्या डोक्यात हवा आहे, बहुमत आहे पण मराठ्यांपुढे सत्तेचे शहाणपण जमत नाही. २९ ऑगस्टचे आंदोलन आंतरवलीमध्ये शांततेत होणार असल्याचे त्यांनी शेवटी स्पष्ट केले.

-----------

## दुष्काळमुक्त महाराष्ट्राचा संकल्प

म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारताने गेल्या बारा वर्षांत जगातील चौथ्या क्रमांकाची मोठी अर्थव्यवस्था होण्याचा टप्पा गाठला असून २५ कोटी नागरिकांना गरिबीतून बाहेर काढण्यात देशाला यश आले आहे. विकसित भारत म्हणजे केवळ विकसित अर्थव्यवस्था नव्हे, तर दीन-दलित, गोरगरीब, आदिवासी, शेतकरी, शेतमजूर आणि महिलांसह समाजातील प्रत्येक घटकाच्या जीवनात सकारात्मक परिवर्तन घडविणे होय, असे म्हणाले.

----------

## 'मुंडे जर काँग्रेसमध्ये आले असते तर

आहे, अशी प्रतिक्रिया देऊन चर्चांना पूर्णविराम दिला. मात्र आता याबाबत उबाठा गटाचे नेते संजय राऊत यांनी एक मोठे विधान केले आहे. संजय राऊत म्हणाले, मुंडे यांना मानसिकदृष्ट्या त्रास दिला जात होता. मानसिक आघात केले जात होते. आम्ही दिल्लीत होतो. ते पवारांना भेटले. ते सज्जन गृहस्थ होते. त्यांनी अशाप्रकारच्या पक्षांतराला विरोध केला होता. त्यामुळे त्यांना आहात, तिथे थांबण्यास सांगितले होते. काँग्रेसमध्ये आले असते तर प्राण वाचले असते, असे राऊत म्हणाले. दरम्यान, भाजपचे ज्येष्ठ दिवंगत नेते गोपीनाथ मुंडे हे काँग्रेसमध्ये प्रवेश करणार होते. यासाठी त्यांनी मंत्रिपदाची अट घातली होती. विशेष म्हणजे काँग्रेस नेत्या सोनिया गांधी यांनी मुंडे यांच्या प्रवेशाला ग्रीन सिग्नल दिला होता. पण तत्कालीन पंतप्रधान मनमोहन सिंग यांनी त्याला विरोध केला होता. मंत्रिपद मिळाले नाही तर नागपूरचे दोघे मला निवडून येऊ देणार नाहीत, अशी भूमिका मुंडे यांनी मांडली होती. मी मुख्यमंत्री असताना गोपीनाथ मुंडे आणि अहमद पटेल यांच्यात गुप्त बैठका झाल्या होत्या,'' असा खळबळजनक दावा पृथ्वीराज चव्हाण यांनी केला आहे.

--------------

## एवढ्या दिवस काय गोट्या

तिकडे गेलात, एवढ्या दिवस काय गोट्या खेळत होतात का? असा सवाल रोहित पवार यांनी उदय सामंत यांना केला आहे. रोहित पवार पुढे म्हणाले की, उद्योगमंत्री म्हणतात एमआयडीसीला जागा देऊ आणि तिथ घरकुल बांधा म्हणजे तुमचे कर्मचारी तिथेच राहतील, असले सोल्युशन देतात काय? पत्रकारांनी त्यांना विचारले की तुम्ही सोल्यूशन काय काढत आहात तर ते म्हणाले आधी मी काय बोललो तेच विसरुन गेलो. उदय सामंत यांनी केवळ मोघम बोलण्याचे काम केले आहे. केवळ आश्वासने त्यांनी दिली आहेत. ते रविवारी गेले त्यामुळे ते वेळेत पोहचले असतील. आता काय होणार ते पाहावे, असें रोहित पवार यांनी म्हटले. उद्योगमंत्र्यांनी ते काय करणार हे सांगणे म्हत्वाचे आहे. नुसतीच चर्चा झाली,मोघम बोलणे झाले. आम्ही हा रस्ता करू, तो रस्ता करू हा आश्वासनाचा पाऊस झाला आहे. उदय सामंत येणार म्हणून डांबर टाकून रस्ते नीट केले आहेत. चाकणमध्ये ३० टक्के वाढ ते म्हणाले, आमचे त्यांना ओपन चलेंज आहेत, आकडेवारीनुसार त्यांनी दाखवून द्यावे, असं रोहित पवार म्हणाले.

----------------

## २२ ऑगस्टला पुण्यामध्ये 'विद्यार्थ्यांचा

या वेळी राहुल गांधी यांनी विद्यार्थ्यांना देशाची सर्वात मोठी ताकद असल्याचे सांगितले होते. त्यांनी 'दर्द, डेटा और दौलत' या मुद्द्यांवर भाष्य करत देशातील ४० कोटी तरुणांची क्षमता देशाच्या भविष्यासाठी महत्त्वाची असल्याचे म्हटले होते. तसेच, 'युवा' या शब्दात देशातील प्रत्येक नागरिकाचा समावेश होत असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले होते. विद्यार्थ्यांशी संबंधित प्रश्नांना राजकीय आणि सामाजिक चर्चेच्या केंद्रस्थानी आणण्याच्या उद्देशाने 'विद्यार्थ्यांचा आवाज' अभियान सुरू करण्यात आले आहे. यापूर्वी कोटा आणि डेहराडून येथे या अभियानांतर्गत कार्यक्रम झाले आहेत. आता पुण्यातील कार्यक्रम हा या मोहिमेतील पुढील महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे. या कार्यक्रमात विशेषतः विद्यार्थिनींचे अधिकार, सुरक्षा आणि त्यांना उपलब्ध होणाऱ्या संधी यावर भर दिला जाणार आहे.

-----------

## शाहरूख खान, अजय देवगणसह

की, संबंधित जाहिरात प्रामुख्याने पानमसाल्याशी जोडलेली आहे. महाराष्ट्रात सार्वजनिक आरोग्य आणि सुरक्षेच्या नियमांनुसार पानमसाल्याच्या उत्पादन, साठवणूक, वाहतूक, वितरण आणि विक्रीवर पूर्ण बंदी आहे. जाहिरातीमुळे ग्राहकांच्या मनात बंदी घातलेल्या ब्रँडची प्रतिमा निर्माण होते. यामुळे ग्राहकांची दिशाभूल होऊ शकते आणि हे अप्रत्यक्षपणे प्रतिबंधित उत्पादनाचेच प्रमोशन ठरते, असेही नोटीसमध्ये म्हटले आहे. गुटखा आणि इतर बंदी घातलेल्या तंबाखूजन्य पदार्थांवर कठोर कारवाईचा धडाका लावणारे तुकाराम मुंडे यांनी तिन्ही अभिनेत्यांकडे त्यांच्या एंडॉर्समेंट कराराच्या प्रती, मोहिमेची माहिती, मानधनाचे तपशील आणि जाहिरात स्वीकारण्यापूर्वी केलेल्या पडताळणीचे पुरावे मागवले आहेत. ग्राहक संरक्षण कायद्यानुसार, अशा प्रकारे दिशाभूल करणाऱ्या जाहिरातींमध्ये सहभागी आढळल्यास अभिनेत्यांवर १० लाख ते ५० लाख रुपयांपर्यंतचा दंड होऊ शकतो. तसेच कोणत्याही उत्पादनाची जाहिरात करण्यावर तीन वर्षांपर्यंतची बंदीही घातली जाऊ शकते. दरम्यान, याआधी २०२२ मध्ये अभिनेता अक्षय कुमार यानेदेखील शाहरूख खान आणि अजय देवगण यांच्यासोबत संबंधित जाहिरातीत काम केले होते. मात्र, चाहत्यांच्या तीव्र आक्षेपानंतर त्याने जाहीर माफी मागितली होती.

----------

## हायकोर्ट लिपिक परीक्षा गोंधळाविरोधातील

नसेल तर कशाला परीक्षा घेता?'' असा संतप्त सवालही त्यांनी विचारला. परीक्षा केंद्रांवरील या भोंगळ कारभारामुळे नैराश्यात आलेल्या परीक्षार्थींचा तीव्र आक्रोश पाहायला मिळाला. ''आता आमच्यावर जीवन संपवण्याची वेळ आली आहे,'' अशा अत्यंत अस्वस्थ करणाऱ्या भावना विद्यार्थ्यांनी व्यक्त केल्या. या संपूर्ण प्रकरणाची तातडीने चौकशी करून जिल्हा न्यायाधीशांनी स्वतः उपस्थित राहून फेरपरीक्षेचे लेखी आश्वासन द्यावे, अशी मागणी यावेळी दीपके यांनी केली. लिपिक पदाची परीक्षा तात्काळ रद्द करून ती पुन्हा नव्याने घेण्यात यावी, या मागणीवर परीक्षार्थी ठाम आहेत. फेरपरीक्षेचा निर्णय होत नाही आणि या प्रकरणाची तातडीने चौकशी केली जात नाही, तोपर्यंत हे ठिय्या आंदोलन असेच सुरू राहील, असा इशारा आंदोलनकर्त्यांसह अभिजीत दीपके यांनी दिला आहे.

-------------



# स्व.विनायकराव मेटे यांच्या पुण्यतिथीनिमित्त सामाजिक उपक्रम

**बीड । प्रतिनिधी**

**शिवसंग्रामचे संस्थापक अध्यक्ष लोकनेते स्वर्गीय विनायकरावजी मेटे साहेब यांच्या पुण्यतिथीनिमित्त शिवसंग्राम विध्यार्थी आघाडी बीड जिल्हा कार्यआध्यक्ष मनीष सुहासराव पाटील यांच्या वतीने व्यंकटेश पब्लिक स्कूल व कनिष्ठ महाविद्यालय येथे ५० गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करून त्यांना वही व विविध शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. तसेच बीड येथील जिव्हाळा निराधार केंद्रात शिवसंग्रामच्या अध्यक्षा डॉ. ज्योती विनायकराव मेटे यांच्या उपस्थितीत निराधारांना चटायांचे वाटप करण्यात आले. अशा प्रकारे विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रोत्साहन देतानाच निराधारांना मदतीचा हात देत स्वर्गीय विनायकराव मेटे साहेबांच्या सामाजिक व शैक्षणिक विचारांना कृतीतून अभिवादन करण्यात आले.**

विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आवश्यक साहित्य उपलब्ध करून देणे आणि समाजातील गरजू, निराधार व्यक्तींना आवश्यक वस्तूंची मदत करणे, या उद्देशाने दोन्ही उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. मेटे साहेबांनी जपलेली सामाजिक बांधिलकी, शैक्षणिक प्रगती आणि वंचित घटकांच्या सेवेसाठीची भूमिका पुढे नेण्याचा हा प्रयत्न असल्याचे यावेळी सांगण्यात आले. व्यंकटेश पब्लिक स्कूल व कनिष्ठ महाविद्यालयातील कार्यक्रमास शिवसंग्रामचे शहराध्यक्ष सुहास पाटील, महाविद्यालयाचे प्राचार्य हावळे सर, उद्योजक सुरज तेंडुलकर, नगरसेवक नागेश तांबारे , तसेच वैभव घुमरे, प्रद्युम परजने, शिक्षकवृंद, विद्यार्थी, पालक व परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. जिव्हाळा निराधार केंद्रातील कार्यक्रमास शिवसंग्रामच्या अध्यक्षा डॉ. ज्योती विनायकराव मेटे यांच्या प्रमुख उपस्थितीत निराधारांना चटायांचे वाटप करण्यात आले. यावेळी राष्ट्रवादी ओबीसी सेलचे प्रदेशाध्यक्ष कल्याणराव आखाडे, शिवसंग्रामचे मराठवाडा अध्यक्ष अनिल घुमरे, योगेश शेळके, पंडितराव माने, गणेश साबळे, कैलास शेजाळ, अशोक लोकरे, हरिश्चंद्र ठोसर, नामदेव धांडे, मेंगडे यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. विद्यार्थ्यांचा सत्कार व शैक्षणिक साहित्य वाटप तसेच निराधारांना चटायांचे वाटप या दोन्ही सामाजिक उपक्रमांचे उपस्थितांनी कौतुक केले.

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
सोमवार, दि. १७ ऑगस्ट २०२६






## जय भवानी महाविद्यालयात युवा सप्ताहाचे आयोजन

पाटोदा । प्रतिनिधी

राष्ट्रीय सेवा योजना विभाग व रेट रिबन क्लब आयोजित येतील जय भवानी कला व विज्ञान महाविद्यालय व बीड येथील एड्स नियंत्रण कक्ष व रेड रिबन क्लब बीड च्या वतीने १२ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट २०२६ या कालावधीत युवा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले या सप्ताहा च्या माध्यमातून आरोग्य विषयक व्याख्यान एड्स जनजागृती रांगोळी स्पर्धा तंबाखू विरोधी शपथ अशा विविध कार्यक्रमाचे आयोजन करून युवकांचे आरोग्य उत्तम ठेवण्याच्या दृष्टिकोनातून युवकांनी दररोज व्यायाम करून आपले आरोग्य निरोगी करण्यासाठी या अभियानास सहभागी व्हावे असे आव्हान प्राचार्य डॉ विश्वास कदम यांनी केले हे अभियान यशस्वी करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना विभाग व रेड रिबन क्लब प्रमुख प्राध्यापक लोखंडे सर व प्राध्यापक बापू घोक्षे हे परिश्रम घेत आहेत या या अभियानात जास्तीत जास्त स्वयंसेवक विद्यार्थी विद्यार्थिनींनी सहभाग घेऊन येड्स जनजागृती करावी असे आव्हान प्राचार्य विश्वास कदम यांनी केले

## डॉ.ओमप्रकाश शेटे यांच्या वाढदिवसानिमित्त शाळेला कपाट भेट




माजलगाव । प्रतिनिधी

सिमरी-पारगाव : आयुष्मान भारत मिशन महाराष्ट्र समितीचे अध्यक्ष तथा सामाजिक कार्यकर्ते डॉ. ओमप्रकाश शेटे यांच्या वाढदिवसानिमित्त सिमरी-पारगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेला नवीन स्टीलचे बुक्स कपाट व विविध शैक्षणिक, कथा, बोधकथा तसेच स्पर्धा परीक्षांसाठी उपयुक्त पुस्तके भेट देण्यात आली.

देवदूत प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्याचे सदस्य सत्यप्रेम पांडुरंग कोरडे यांच्या पुढाकारातून हा उपक्रम राबविण्यात आला. विद्यार्थ्यांना वाचनाची गोडी लागावी, ज्ञानात भर पडावी आणि त्यांचा सर्वांगीण विकास व्हावा, हा या उपक्रमामागील उद्देश आहे. या उपक्रमाचे ग्रामस्थ व शिक्षकांनी स्वागत केले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी अशा उपक्रमांची गरज असल्याचे यावेळी व्यक्त करण्यात आले.

# जिल्हाधिकारी कार्यालयासमोर 'पैशाचं झाड' लक्ष्यवेधी आंदोलन
# वनविभागातील गैरव्यवहारांची चौकशी करण्याची मागणी

बीड । प्रतिनिधी

जिल्ह्यातील वनविभागातील वनीकरणासह इतर कामांमध्ये सुरू असलेल्या अनागोंदी कारभार, अनियमितता आणि गैरव्यवहारांच्या निषेधार्थ सामाजिक कार्यकर्ते तथा बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचे मुख्य प्रचार प्रमुख डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली १५ आगस्ट स्वातंत्र्यदिनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर 'वनविभागातील झाडांना पैसे' हे लक्ष्यवेधी आंदोलन करण्यात आले.

या आंदोलनात डॉ. गणेश ढवळे यांच्यासह माहिती अधिकार कार्यकर्ते शेख युनुस चऱ्हाटकर आणि मुजीब इनामदार यांनी सहभाग घेतला. हरित अभियानांतर्गत ४२ कोटी रुपये खर्च करून कागदोपत्री वृक्षलागवड करण्यात आल्याचा आरोप करत या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कारवाईची मागणी आंदोलनकर्त्यांनी पालकमंत्री सुनेत्रा पवार यांच्याकडे केली आहे.

यावेळी प्रादेशिक विभागीय वन अधिकारी अमोल गर्कळ यांच्या कार्यकाळातील कामांची चौकशी करण्यात यावी, तसेच त्यांच्या संपत्तीची लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत तपासणी करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली.

आंदोलनकर्त्यांनी सांगितले की, वनविभागातील भ्रष्टाचार आणि अनियमिततेसंदर्भात सामाजिक कार्यकर्ते, सामाजिक संघटना आणि लोकप्रतिनिधींनी अनेक वेळा लेखी निवेदने देऊन चौकशीची मागणी केली आहे. मात्र, जिल्हा प्रशासन आणि वनविभागातील वरिष्ठ अधिकारी या प्रकरणाकडे अर्थपूर्ण दुर्लक्ष करत असल्याचा आरोप त्यांनी केला.

सामाजिक वनीकरण विभागाचे विभागीय वनाधिकारी श्रीनिवास लखमावाड यांना ४५ लाख रुपयांच्या लाच प्रकरणात अटक करण्यात आली असून त्यांचे निलंबन करण्यात आले आहे. त्यांना सेवेतून बडतर्फ करून संबंधित सर्व प्रकरणांची निष्पक्ष चौकशी करण्यात यावी, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली.




## जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा चिंचाळा येथे ८०वा स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा चिंचाळा येथे आज १५ ऑगस्ट रोजी ८०वा स्वातंत्र्य दिन अत्यंत उत्साहपूर्ण आणि देशभक्तीपर वातावरणात साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमास गावचे पंचायत समिती सभापती बळीराम (बापू ) आजबे , सरपंच श्री. सुभाष आजबे, उपसरपंच श्री. लक्ष्मण मुंडे, पोलीस पाटील श्री. संजय कुलकर्णी, शालेय शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री. प्रदीप चाळक, उपाध्यक्ष श्री. संदीप माने, सदस्य श्री. सय्यद, श्री. शिंगाडे, श्री. ज्ञानेश्वर पवार, श्री. त्रिंबक पायके, पालक, श्री. महादेव मुंडे, अंगणवाडी ताई, मुख्याध्यापिका श्रीमती पिचड मॅडम, श्रीमती चंदनशिव मॅडम, श्री. लिंगसकर सर, श्री. राठोड सर, श्री. आडे सर, श्री. रोहिदास चव्हाण सर, तसेच शिवाजी आजबे, श्री सर्जेराव जाधव, विष्णुपंत नेमाटे, नंदू चोरमले, ज्येष्ठ नागरिक आणि पालक , शाळेतील सर्व विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात ध्वजारोहण, राष्ट्रगीत, राज्यगीत, वंदे मातरम् गायन, महापुरुषांच्या प्रतिमांचे पूजन, संविधानाच्या प्रस्ताविकेचे वाचन, कवायत, निपुण भारत प्रतिज्ञा आणि व्यसनमुक्ती शपथ अशा विविध उपक्रमांनी






झाली. शाळेतील विद्यार्थ्यांनी स्वातंत्र्य दिनाचे महत्त्व सांगणारी प्रभावी भाषणे सादर करून उपस्थितांची मने जिंकली.

यावेळी मुख्याध्यापिका श्रीमती पिचड मॅडम यांनी शाळेच्या शैक्षणिक व सर्वांगीण प्रगतीबाबत माहिती देताना शाळेसमोरील विविध अडचणी आणि भविष्यातील उपक्रमांविषयी मार्गदर्शन केले. चंदनशिव मॅडम यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रभावीपणे केले. शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष यांनी शाळेच्या प्रगतीसाठी येणाऱ्या अडचणी सोडविण्यासाठी सर्व पालकांनी व ग्रामस्थांनी आवश्यक पाठपुरावा करावा, असे आवाहन केले. पोलीस पाटील श्री. संजय कुलकर्णी यांनीही शाळेच्या प्रगतीचे कौतुक करून शिक्षक व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

यावेळी शाळेतील शिक्षक व विद्यार्थ्यांनी ग्रामपंचायत येथे ध्वजारोहणास उपस्थिती लावली तसेच सोसायटीच्या ध्वजारोहण कार्यक्रमात सहभाग घेतला. त्यानंतर गावातून जनजागृती रॅली काढण्यात आली. विद्यार्थ्यांनी विविध देशभक्तीपर व सामाजिक जनजागृतीपर घोषवाक्ये देत नागरिकांमध्ये जागृती निर्माण केली. विविध देशभक्तीपर आणि सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा चिंचाळा येथे ८०वा स्वातंत्र्य दिन आनंद, उत्साह आणि देशभक्तीच्या वातावरणात दिमाखात संपन्न झाला.

## पान ६ वरुन...

### पशुवैद्यकीय महाविद्यालय

मुख्य कार्यकारी अधिकारी जतीन रहेमान, पोलीस अधीक्षक नवनीत कावत, अक्षय मुंदडा आदी मान्यवर उपस्थित होते.

**प्रगतीची नवी पायाभरणी**

यावेळी बोलताना उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांनी सांगितले की, बीड जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाचे जे स्वप्न अजितदादांनी बघितले हे पूर्णत्वास घेऊन जाण्याचा आपला प्रयत्न राहणार आहे. मराठवाडा हा कष्टकऱ्यांचा प्रदेश आहे, शेतीला आधार देणाऱ्या पशुधनाची काळजी घेणे ही आजच्या काळाची गरज आहे. परळीत उभे राहणारे हे महाविद्यालय मराठवाड्यातील विद्यार्थ्यांसाठी उच्च दर्जाच्या पशुवैद्यकीय शिक्षणाचे मोठे केंद्र ठरेल. या महाविद्यालयात अत्याधुनिक शैक्षणिक सुविधा, सुसज्ज प्रयोगशाळा, संशोधन केंद्र, वसतिगृह आदी सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. परळीच्या आसपासच्या ५० ते १०० गावांतील पशुधनावर आधुनिक उपचारांची सुविधा स्थानिक पातळीवर उपलब्ध होईल. दूध उत्पादन वाढविणे, शेळीपालन अधिक फायदेशीर करणे तसेच पशुपालनाशी संबंधित विविध विषयांवर संशोधन केले जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.या महाविद्यालयातून केवळ नोकरी शोधणारे डॉक्टर तयार होऊ नयेत, तर पेट केअर क्लिनिक, डेअरी सल्लागार सेवा, पशुखाद्य निर्मिती आणि पशुपालनाशी संबंधित विविध क्षेत्रांत रोजगार निर्माण करणारे तरुण उद्योजक घडावेत अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

**कृषी पाठोपाठ पशुवैद्यकीय महाविद्यालयामुळे राष्ट्रीय पातळीवर परळीचा लौकिक – आ.धनंजय मुंडे**

या महत्त्वाकांक्षी प्रकल्पामुळे मराठवाड्यातील विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय दर्जाचे पशुवैद्यकीय शिक्षण, संशोधन व प्रशिक्षणाच्या संधी उपलब्ध होण्याबरोबरच पशुपालक व शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीला मोठी चालना मिळणार आहे. या प्रकल्पाचे स्वागत करताना परळीमध्ये पशुवैद्यक महाविद्यालयाबरोबरच कृषी महाविद्यालयही आंतरराष्ट्रीय दर्जाचे होत असल्याबद्दल माजी मंत्री तथा आमदार धनंजय मुंडे यांनी आनंद व्यक्त केला. तसेच बारामती येथील पशुवैद्यकीय महाविद्यालयाला अजितदादा पवार यांचे तर परळीतील पशुवैद्यकीय महाविद्यालयाला लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांचे नाव द्यावे अशी मागणी आ. धनंजय मुंडे यांनी केली. कार्यक्रमास मतदारसंघातील नागरिक, महिला तसेच भाजप, राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### पीक विम्याचा प्रश्न महिनाभरात

विमा प्रक्रियेतील अडथळे दूर करावेत आणि बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना न्याय द्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे.शेतकऱ्यांचा संयम आता संपत आला आहे. महिनाभरात प्रश्न सोडवला तर ठीक; अन्यथा माजलगाव तहसील कार्यालय अथवा बीड कलेक्टर ऑफिसवर प्रचंड मोर्चा काढून शासनाला जाब विचारल्याशिवाय राहणार नाही, असा इशारा शेतकरी नेते भाई गंगाभिषण थावरे यांनी दिला.

### डोंगरकिन्ही गटातील शेतकऱ्यांनी

तात्काळ पूर्ण करून घ्यावी, असे ड.कवठेकर यांनी स्पष्ट केले. दरम्यान, केवळ प्रक्रियात्मक किंवा तांत्रिक त्रुटींमुळे एकही पात्र शेतकरी कर्जमाफीच्या लाभापासून वंचित राहू नये, यासाठी प्रशासनाने सकारात्मक व गतीमान पावले उचलावीत, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

**सेवा केंद्रांत संपर्क साधण्याचे आवाहन**

पात्र शेतकऱ्यांनी आपली ओळखपत्रे, बँक कर्ज खात्याचे पासबुक, बचत खात्याचे पासबुक व अन्य आवश्यक कागदपत्रांसह जवळच्या 'आपले सरकार सेवा केंद्रा'त जाऊन आधार प्रमाणीकरण आणि ग्रीस्टॅक नोंदणी पूर्ण करावी. नोंदणीदरम्यान काही तांत्रिक अडचणी किंवा कागदपत्रांची त्रुटी उद्भवल्यास संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधून ती सोडवून घ्यावी, असा सल्लाही त्यांनी दिला.

### शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी

शैक्षणिक नुकसान होत आहे. तसेच मागील सहा वर्षापासून संबंधित शाळेला संस्थेचा मुख्याध्यापक नसून सेवा जेष्ठतेच्या निकषानुसार मुख्याध्यापक नियुक्त करणेबाबत शिक्षणाधिकारी माध्यमिक यांच्याकडे मागणी केली असता अद्यापही याबाबत कसलीही दखल घेतली गेलेली नाही.याबाबत मा. श्रीमती सुनेत्राताई पवार व मा.ना.श्री धनंजय मुंडे यांनी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड यांना संबंधीत शाळेतील कर्मचारी यांना आपल्या स्तरावरून नियमानुसार वेतन देण्यात यावे याबाबत सूचना देण्यात आल्या.यावेळी शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते असे अविनाश तांदळे राज्य उपाध्यक्ष प्रहार शिक्षक संघटना महाराष्ट्र राज्य यांनी एका प्रसिद्धी द्वारे कळविले आहे.

### शिवसैनिकांच्या अडचणी सोडवण्यासाठी

यावेळी शिवसेनेचे बीड जिल्हाप्रमुख अँड. चंद्रकांत आप्पा नवले यांनी आपल्या भाषणातून गेवराईतील शिवसेनेच्या वाढत्या संघटनात्मक ताकदीचा आढावा घेतला.ते म्हणाले, साहेब, ज्यावेळी मी शिवसेनेचा जिल्हाप्रमुख झालो, त्यावेळी गेवराई विधानसभा मतदारसंघात एखादा कार्यक्रम घेतला तर दहा-वीस माणसे जमवणेही अवघड जात होते. मात्र आज परिस्थिती पूर्णपणे बदललेली आहे. आज एका फोनवर गेवराई असो किंवा बीडचा कार्यक्रम असो, शेकडो शिवसैनिक एकजुटीने उपस्थित राहतात. शिवसेनेच्या पाठीशी ठामपणे उभे राहण्याचा निर्धार करून अनेक जण शिवसैनिक होण्यासाठी पुढे येत आहेत, याचा मला मनस्वी आनंद आहे.गेवराई मतदारसंघातील प्रत्येक गावात संघटन अधिक मजबूत करण्यासाठी बीएलए-२ नियुक्त करण्याचे काम सुरू असून, बीएलए-२च्या माध्यमातून प्रत्येक मतदारापर्यंत पोहोचण्याचे नियोजन करण्यात आले आहे. एकाही शिवसैनिकाचे नाव मतदार यादीतून वगळले जाऊ नये, यासाठी सर्व पदाधिकाऱ्यांना सूचना करण्यात आल्याचे नवले यांनी सांगितले. ते पुढे म्हणाले, आपल्याला उत्तुंग असे नेतृत्व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेबांच्या रूपाने मिळाले आहे. आपण सत्याच्या बाजूने आहोत. कोणत्याही कार्यकर्त्याचे काम अडले असेल, कोणतीही अडचण असेल तर माझ्याशी संपर्क करा. ना.भरतशेठ गोगावले, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब, खा.श्रीकांत शिंदे साहेब आणि संपर्कप्रमुख मनोज शिंदे साहेब यांच्या माध्यमातून ते काम मार्गी लावण्यासाठी मी प्रयत्न करणार आहे.

काम न करणाऱ्या पदाधिकाऱ्यांना पदावर राहता येणार नाही

संघटनेतील पदाधिकाऱ्यांना स्पष्ट शब्दांत सूचना देताना अँड. नवले म्हणाले, शिवसेना ही कोण्या एका पदाधिकाऱ्याची नाही. शिवसेना ही सर्वसामान्य शिवसैनिकांची आणि जनतेची आहे. त्यामुळे प्रत्येक पदाधिकाऱ्याने जबाबदारीने आणि प्रामाणिकपणे काम केले पाहिजे. वारंवार सूचना देऊनही जे पदाधिकारी काम करणार नाहीत, त्यांच्या जागी काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना संधी दिली जाईल. काम न करणाऱ्यांना पदच्युत करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला. या भूमिकेमुळे संघटनेत काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना नवी ऊर्जा मिळणार असून, गावागावात शिवसेनेची संघटनात्मक बांधणी अधिक गतिमान होणार असल्याचे वातावरण मेळाव्यात दिसून आले.

## बीडचे सुपुत्र सपोनि.संजय तुपे यांना अति उत्कृष्ट सेवा पदक

बीड । प्रतिनिधी

गोंदिया पोलीस दलात कार्यरत असलेले बीडचे भूमिपुत्र सहाय्यक पोलीस निरीक्षक संजय तुपे यांना केंद्रीय गृह मंत्रालयाचे अति उत्कृष्ट सेवा पदक प्रदान करण्यात आले. स्वातंत्र्यदिनाच्या औचित्याने गोंदिया येथे आयोजित कार्यक्रमात गोंदिया जिल्ह्याचे पालकमंत्री इंद्रनील नाईक यांच्या हस्ते संजय तुपे यांना हे पदक प्रदान करण्यात आले.

पोलीस दलातील अधिकारी व अंमलदारांच्या दीर्घकालीन, उल्लेखनीय, गुणवत्तापूर्ण आणि निष्कलंक सेवेची दखल घेण्यासाठी केंद्रीय गृह मंत्रालयाने दि.२३ जुलै २०१८ व २९ सप्टेंबर २०२२ रोजीच्या अधिसूचनांनुसार उत्कृष्ट सेवा पदक आणि अतिउत्कृष्ट सेवा पदक देण्याची तरतूद केली आहे. दीर्घकाळ उल्लेखनीय व गुणवत्तापूर्ण निष्कलंक सेवा बजावणाऱ्या अधिकारी व अंमलदारांची या पदकांसाठी निवड केली जाते. संजय तुपे यांनी पोलीस उपनिरीक्षक म्हणून कार्यरत असताना बीडच्या स्थानिक गुन्हे शाखेत उल्लेखनीय काम केले आहे. तपासातील बारकावे, गुन्हे उघडकीस आणण्याची



हातोटी आणि कामातील वेगळा ठसा उमटविण्याची त्यांची पद्धत यामुळे त्यांनी बीडमध्येच आपल्या कार्याची छाप निर्माण केली होती. यानंतर गोंदिया, चंद्रपूर आणि गडचिरोली या भागांत बदली झाल्यानंतरही त्यांनी आपल्या कार्यक्षमतेची परंपरा कायम ठेवली. गोंदिया पोलीस दलातही त्यांनी उल्लेखनीय कामगिरी बजावत उत्कृष्ट सेवा दिल्याने त्यांना अतिउत्कृष्ट सेवा पदकाने सन्मानित करण्यात आले. संजय तुपे यांना मिळालेल्या सन्मानाबद्दल त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

## सामाजिक कार्यकर्ते नवीद सिद्दिकी यांचे मुख्याधिकारी यांच्या आश्वासनानंतर उपोषण मागे





### भ्रष्टाचारविरोधी लढा सुरूच ठेवण्याचा निर्धार

माजलगाव । प्रतिनिधी

येथील नगरपरिषदेसमोर विविध प्रलंबित मागण्यांसाठी १४ ऑगस्ट रोजी उपोषणास बसलेले सामाजिक कार्यकर्ते नवीद सिद्दिकी यांनी प्रशासनाच्या लेखी आश्वासनानंतर आपले उपोषण मागे घेतले आहे. माजलगावचे नवनियुक्त मुख्याधिकारी, संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी उपोषणस्थळी प्रत्यक्ष भेट देऊन १५ दिवसांत संबंधित प्रकरणांची शासन नियमानुसार चौकशी करून कडक कारवाई करण्याचे ठोस आश्वासन दिले. या आश्वासनानंतर सिद्दिकी यांनी प्रशासनावरील विश्वासापोटी आपले आंदोलन तात्पुरते स्थगित केले आहे.

या आंदोलनादरम्यान माजलगाव शहरातील अनेक आजी-माजी नगरसेवक, विविध राजकीय पक्षांचे नेते, सामाजिक कार्यकर्ते आणि शेकडो सामान्य नागरिकांनी उपोषणस्थळी भेट देऊन नवीद सिद्दिकी यांच्या मागण्यांना जाहीर पाठिंबा दर्शवला. उपोषण मागे घेतल्यानंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना नवीद सिद्दिकी म्हणाले, माझ्या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी आणि आपला अमूल्य वेळ काढून मला भेटण्यासाठी आलेल्या सर्व आजी-माजी नगरसेवक, नेते, कार्यकर्ते

## माजलगावात ८० व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त कायदेविषयक जनजागृती वॉकथॉन

**तालुका विधी सेवा समिती व वकील संघाचा संयुक्त उपक्रम; बालहक्क, महिला संरक्षण व कायदेविषयक जनजागृतीचा संदेश**

माजलगाव । प्रतिनिधी

८० व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त माजलगाव येथे तालुका विधी सेवा समिती व वकील संघ, माजलगाव यांच्या संयुक्त विद्यमाने कायदेविषयक जनजागृती वॉकथॉनचे आयोजन करण्यात आले. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, बीडचे अध्यक्ष मा. श्री. दिनेश पी. सुराणा यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम उत्साहात पार पडला.

ध्वजारोहण कार्यक्रमानंतर न्यायालय परिसरातून वॉकथॉनला सुरुवात करण्यात आली. या वॉकथॉनच्या माध्यमातून बालमजुरी प्रतिबंध, बालविवाह प्रतिबंध,




वेठबिगार मजुरी निर्मूलन कायदा, बालकांचे लैंगिक अत्याचारापासून संरक्षण तसेच शिक्षणाचा अधिकार यांसह विविध कायद्यांबाबत नागरिकांमध्ये जनजागृती करण्यात आली.

या जनजागृती उपक्रमात जिल्हा न्यायाधीश राजश्री परदेशी मॅडम, जिल्हा न्यायाधीश डॉ.उमेशचंद्र मोरे दिवाणी न्यायाधीश क.स्तर श्री. चामले, दिवाणी न्यायाधीश क.स्तर खुपसे, श्री. पवार तसेच वकील संघाचे अध्यक्ष ड.नारायण गोले पाटील, उपाध्यक्ष अॅड. बाजाज, सचिव अॅड. तेलगाड व इतर पदाधिकारी सहभागी झाले होते. तसेच वकील मंडळी, पंचायत समितीचे अधिकारी-कर्मचारी, न्यायालयीन कर्मचारी, विविध शाळांचे विद्यार्थी-विद्यार्थिनी, शिक्षकवृंद, पोलीस अधिकारी व कर्मचारी, ग्रामीण रुग्णालयाचे कर्मचारी, नगरपरिषदेचे अधिकारी-कर्मचारी आणि विविध माध्यमांचे पत्रकार व वार्ताहर



मोठ्या संख्येने सहभागी झाले. सदर वॉकथॉनचे आयोजन न्यायालय परिसरातून छत्रपती संभाजी महाराज चौक ते छत्रपती शिवाजी महाराज चौक बसस्थानकापर्यंत करण्यात आले. या उपक्रमाला समाजातील नागरिक व विविध घटकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. वॉकथॉनदरम्यान विद्यार्थ्यांनी व सहभागी सदस्यांनी बालकांचे संरक्षण व बेटी बचाओ, बेटी पढाओ हा मुख्य संदेश जनतेपर्यंत पोहोचविला. तसेच लोकन्यायालय व मध्यस्थीच्या माध्यमातून वाद सामोपचाराने मिटविण्याबाबतही नागरिकांना संदेश देण्यात आला. कायदेविषयक जनजागृतीच्या माध्यमातून नागरिकांना आपल्या हक्कांची माहिती मिळावी, कायद्याचे पालन व्हावे आणि सामाजिक प्रश्नांवर कायदेशीर मार्गाने तोडगा काढण्याची भावना वाढीस लागावी, हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश होता.

# मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन योजनेत पारदर्शकता आवश्यक; अर्जदारांवर आर्थिक बोजा नको !

## एका कुटुंबातून अनेक अर्ज सादर करण्याचे निर्देश पशुसंवर्धन विभागातून येत असल्याने अर्जदार संभ्रमात- अजय सरवदे

बीड / प्रतिनिधी

मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजनेची प्रत्यक्ष अंमलबजावणी सुरू होण्यापूर्वीच अर्ज प्रक्रिया, लाभार्थी निवड, प्रशिक्षण व अनुभव प्रमाणपत्रांच्या शुल्काबाबत ग्रामीण भागातील नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. एका कुटुंबातील चार ते पाच व्यक्तींनी स्वतंत्र अर्ज करावेत, तसेच अर्जांची संख्या वाढल्यास लकी ड्रॉद्वारे लाभार्थी निवड केली जाणार असल्याची चर्चा सुरू आहे. या सर्व बाबींची तातडीने स्पष्टता करून पारदर्शक प्रक्रिया निश्चित करावी, अशी मागणी वंचित बहुजन आघाडीचे बीड जिल्हाध्यक्ष प्रतिक उर्फ अजय सरवदे यांनी शासनाकडे निवेदनाद्वारे केली आहे.

गाय, म्हैस, शेळी-मेंढी व कुक्कुटपालनाच्या माध्यमातून ग्रामीण नागरिकांना स्वयंरोजगार उपलब्ध करून देणारी ही योजना महत्त्वाची असल्याचे नमूद करताना सरवदे यांनी योजनेला विरोध नसून, ती खऱ्या लाभार्थ्यांसाठी पारदर्शक व सर्वसमावेशक पद्धतीने राबविण्याची मागणी केली आहे. एका अर्जासाठी कागदपत्रे, प्रकल्प अहवाल, प्रशिक्षण व अनुभव प्रमाणपत्र आदींसाठी सुमारे ७ ते ८



हजार खर्च येत असल्याची माहिती नागरिकांकडून मिळत आहे. एका कुटुंबातील चार-पाच जणांनी अर्ज केल्यास हा खर्च ३० ते ३५ हजारांपर्यंत जाऊ शकतो. त्यानंतर निवड झाली नाही तर हा खर्च वाया जाण्याची शक्यता असल्याने अर्जदारांवर अनावश्यक आर्थिक भार टाकू नये, अशी मागणी करण्यात आली आहे. याशिवाय जिल्हा उद्योग केंद्र व पशुसंवर्धन विभागामार्फत देण्यात येणाऱ्या प्रशिक्षण व अनुभव प्रमाणपत्रांच्या शुल्कात मोठी तफावत असल्याची माहिती असून, त्याची चौकशी करून अधिकृत शुल्क व प्रमाणपत्रांची ग्राह्यता स्पष्ट करावी, अशी मागणी आहे. मागील काळात मोठ्या प्रमाणावर अनुभव प्रमाणपत्रे वितरित झाली असल्यास त्याचे तालुकानिहाय ऑडिट करण्याची मागणीही करण्यात आली आहे. महिला लाभार्थ्यांमध्ये मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन योजनेचा लाभ घेतल्यास 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेचा लाभ बंद होईल का, याबाबतही संभ्रम आहे. शासनाने याबाबत तातडीने अधिकृत स्पष्टीकरण द्यावे, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.सरकारने अर्ज प्रक्रिया सुरू करण्यापूर्वी आवश्यक कागदपत्रांची अंतिम यादी, अधिकृत शुल्क, एका कुटुंबातील अर्जांची मर्यादा, तालुकानिहाय लाभार्थी संख्या, पात्रता निकष, प्राधान्यक्रम व लाभार्थी निवड पद्धती जाहीर करावी. लकी ड्रॉची तरतूद असल्यास त्याचे नियम, समिती, व्हिडिओ रेकॉर्डिंग व निकाल जाहीर करण्याची पद्धतही आधीच सार्वजनिक करावी. पात्र मात्र निवड न झालेल्या अर्जदारांसाठी प्रतीक्षा यादी ठेवून पुढील टप्प्यात संधी द्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. याबाबत अपर मुख्य सचिव, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभाग, आयुक्त पशुसंवर्धन विभाग, जिल्हाधिकारी बीड, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड आणि जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी/उपायुक्त बीड यांना निवेदन देण्यात आले आहे.

''योजनेला विरोध नाही मात्र योजना सुरू होण्यापूर्वीच नागरिकांनी हजारो रुपये खर्च करून अर्ज करावा आणि नंतर अनिश्चित निवड प्रक्रियेमुळे आर्थिक नुकसान सहन करावे, अशी परिस्थिती निर्माण होऊ नये. शासनाने आधी नियम स्पष्ट करावेत.'' ऑनलाइन महाडीबीटी पोर्टलवर लोड येऊ नये यासाठी अगोदरच पूर्व नियोजन करावे जेणेकरून अर्जदारास अर्ज भरण्यास त्रास होऊ नये. महाडीबीटी पोर्टल वर कशा पद्धतीने अर्ज सादर करायचा त्याचे चित्रीकरण सादर करावे.

# लाळ खुरकूत लसीकरणाच्या नवव्या मोहिमेला प्रारंभ

पुणे: गाय, म्हैस, शेळ्या आणि मेंढ्यांमध्ये आढळणाऱ्या विषाणूजन्य लाळ खुरकूत रोगाच्या नियंत्रणासाठी राज्यात प्रतिबंधात्मक लसीकरणाच्या नवव्या मोहिमेला प्रारंभ झाला आहे. या मोहिमेत १ कोटी ५१ लाख पशुधनाच्या लसीकरणाचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. केंद्र आणि राज्य सरकारने २०३० अखेर या रोगाच्या निर्मूलनाचे उद्दिष्ट ठेवले असल्याची माहिती पशुसंवर्धन आयुक्त डॉ. किरण पाटील यांनी दिली.

लाळ खुरकूत हा गाय, म्हैस, शेळ्या व मेंढ्यांमधील प्रमुख विषाणूजन्य आणि संसर्गजन्य रोग असून, पशुपालकांसमोरील मोठे आव्हान आहे. या रोगाच्या फैलावामुळे पशुजन्य पदार्थांच्या उत्पादनावर विपरीत परिणाम होतो. तसेच त्यांच्या निर्यातीवरही निर्बंध येतात. परिणामी पशुपालनावर आधारित व्यवसायांचे आर्थिक नुकसान होते, असे डॉ. पाटील यांनी सांगितले. लसीकरणाद्वारे लाळ खुरकूत रोगावर नियंत्रण मिळविणे हे पशुधन विकासाच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. केंद्रपुरस्कृत पशुस्वास्थ्य व रोगनियंत्रण समूह योजनेतील राष्ट्रीय पशुरोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत लाळ खुरकूत आणि सांसर्गिक गर्भपात या दोन रोगांचे प्रतिबंधात्मक लसीकरण



केले जात आहे. त्याद्वारे २०३० पर्यंत या रोगांवर नियंत्रण आणि निर्मूलनाचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. या कार्यक्रमात महाराष्ट्रासह नऊ राज्ये लाळ खुरकूतमुक्त करण्याचे उद्दिष्ट आहे. फेब्रुवारी ते मार्च २०२६ दरम्यान झालेल्या आठव्या फेरीत राज्यातील १ कोटी ५१ लाख पशुधनाचे लाळ खुरकूत प्रतिबंधक लसीकरण करण्यात आले. या लसीकरणाच्या नोंदी 'भारत पशुधन' प्रणालीवर घेण्यात आल्या आहेत. लसीकरणाची नववी फेरी १३ ऑगस्ट ते २९ सप्टेंबर या कालावधीत राबविण्यात येणार आहे. मोहिमेसाठी १ कोटी १९ लाख लसमात्रा आणि आवश्यक साधनसामग्रीचा पुरवठा करण्यात आल्याचे डॉ. पाटील यांनी सांगितले. लसीकरण मोहिमेत पशुधनाच्या स्थलांतर मार्गावरील जनावरे, गोशाळांमधील, तसेच मोकाट पशुधनाच्या लसीकरणावरही भर दिला जाणार आहे. लाळ खुरकूत रोगाची बाधा होण्याची शक्यता असलेल्या वन्यप्राण्यांमध्ये रोगाचा प्रसार होऊ नये यासाठी वनक्षेत्रालगतच्या गावांतील पाळीव पशुधनाचे प्राधान्याने लसीकरण करण्यात येणार आहे. आपल्या पशुधनाचे आरोग्य सुदृढ राहण्यासाठी प्रत्येक पशुपालकाने पशुधनाचे लसीकरण करून घ्यावे. या लसीकरणामुळे २०३० अखेर लाळ खुरकूत रोगाचे निर्मूलन करण्याच्या उद्दिष्टाला मदत होईल.

# ठिबक सिंचनाद्वारे हळद पिकाचे खत व्यवस्थापन

हळद हे ८ ते ९ महिन्यांचे महत्त्वाचे नगदी पीक असून, चांगले उत्पादन मिळवण्यासाठी पिकाच्या प्रत्येक वाढीच्या टप्प्यावर योग्य प्रमाणात अन्नद्रव्यांचा पुरवठा करणे आवश्यक आहे. हळद पिकाला ठिबक सिंचनाद्वारे खते देण्याच्या पद्धतीला फर्टिगेशन असे म्हणतात. या पद्धतीमुळे पिकाला आवश्यकतेनुसार अन्नद्रव्ये उपलब्ध करून देता येतात आणि खतांचा अपव्ययही कमी होण्यास मदत होते.

हळद पिकासाठी संपूर्ण हंगामातील खतांची मात्रा : नत्र ६० किलो, स्फुरद ३० किलो, पालाश ३० किलो. देण्याचे नियोजन असायला हवे. मात्र ही संपूर्ण मात्रा एकाच वेळी न देता पिकाच्या वाढीच्या टप्प्यानुसार आठवड्याच्या हप्त्यांमध्ये विभागून देणे महत्त्वाचे आहे. हळद लागवडीनंतरच्या सुरुवातीच्या काळात पिकाची उगवण आणि सुरुवातीची वाढ चांगली होण्यासाठी योग्य खत व्यवस्थापन करणे आवश्यक आहे. या टप्प्यात नत्र ६ किलो, स्फुरद ६ किलो, पालाश ३ किलो द्यावे. ही मात्रा दोन समान हप्त्यांमध्ये विभागून देण्यात यावी. प्रति आठवडा नत्र ३ किलो, स्फुरद ३ किलो, पालाश १.५ किलो. दहा आठवड्यांच्या या कालावधीसाठी नत्र ३० किलो, स्फुरद ९ किलो, पालाश ६ किलो देण्याचे नियोजन असावे. प्रति आठवडा नत्र ३ किलो, स्फुरद ९०० ग्रॅम, पालाश ६०० ग्रॅम. अशा पद्धतीने ठिबक सिंचनातून खतांचा पुरवठा करावा.

कंद वाढीस सुरुवात : लागवडीनंतर १५ ते २६ आठवड्यांच्या कालावधीत हळदीच्या कंदांची वाढ सुरू होते. त्यामुळे या टप्प्यावर खतांचे योग्य संतुलन राखणे महत्त्वाचे आहे. १२ आठवड्यांसाठी नत्र १५ किलो, स्फुरद ९ किलो, पालाश ९ किलो देण्यात यावे. प्रति आठवडा नत्र १.२५ किलो,



स्फुरद ७५० ग्रॅम, पालाश ७५० ग्रॅम ठिबक सिंचनाद्वारे देण्याचे नियोजन करावे. कंद तयार होण्याचा काळ २७ ते ३२ आठवडे : हळद पिकाच्या शेवटच्या वाढीच्या टप्प्यात कंदांची चांगली वाढ आणि विकास होण्यासाठी खत व्यवस्थापनाकडे विशेष लक्ष देणे गरजेचे आहे. ६ आठवड्यांच्या या कालावधीसाठी नत्र ९ किलो, स्फुरद ६ किलो, पालाश १२ किलो देण्याचे नियोजन असावे. प्रति आठवडा नत्र १.५ किलो, स्फुरद १ किलो, पालाश २ किलो ठिबक सिंचनाद्वारे द्यावे. हळदीमध्ये फर्टिगेशनचे महत्त्व :

हळद पिकाला सर्व खत एकाच वेळी देण्याऐवजी पिकाच्या गरजेनुसार लहान-लहान हप्त्यांमध्ये ठिबक सिंचनाद्वारे खत देणे फायदेशीर ठरते. यामुळे अन्नद्रव्यांचा अपव्यय कमी करण्यास मदत होते आणि पिकाच्या मुळांना आवश्यक त्या वेळी अन्नद्रव्ये उपलब्ध होतात. विशेषतः कंद वाढीच्या काळात पिकाला योग्य प्रमाणात अन्नद्रव्ये मिळाल्यास कंदांच्या विकासासाठी त्याचा फायदा होऊ शकतो.

# लव्हाळा तण शेतीसाठी मोठा अडथळा, त्याचा बंदोबस्त करण्यासाठी करा हे उपाय

लव्हाळा हे सर्वात त्रासदायक आणि बारमाही तण मानले जाते. अनेक भागांत याला नागरमोथा असे म्हटले जाते. मका, ऊस, कापूस यांसारख्या पिकांमध्ये लव्हाळ्यामुळे पिकांशी अन्नद्रव्ये, पाणी आणि जागेसाठी स्पर्धा होते. विशेष म्हणजे हे तण एकदा शेतात वाढले की केवळ वरचा भाग कापून त्याचे नियंत्रण होत नाही. त्यामुळे लव्हाळ्याचे एकात्मिक पद्धतीने व्यवस्थापन करणे गरजेचे आहे. लव्हाळा तणाच्या जमिनीखाली गाठी/ कंद तयार होतात. जमिनीखाली एका मातृकंदापासून कंदांची साखळी तयार होते आणि ती सुमारे ६० सेंमी खोलीपर्यंत पसरू शकते. लव्हाळ्याचा प्रसार प्रामुख्याने या गाठींमधून होतो. बियांद्वारे होणारा प्रसार तुलनेने कमी असून तो २ ते १० टक्के आहे. लव्हाळ्याची वाढही वेगाने होते. वाढीच्या पहिल्या एका महिन्यात एक मातृकंद सुमारे चार कंद तयार करू शकतो. तर तीन महिन्यांत कंदांची संख्या साधारण १०० पर्यंत पोहोचू शकते. त्यामुळे सुरुवातीलाच त्याचे नियंत्रण करणे महत्त्वाचे आहे.

पीक फेरपालट आणि आच्छादन :शेतात दर हंगामात एकच पीक न घेता राजगीरा, मोहरी, ज्वारी, हरभरा, गहू, भुईमूग आणि तूर यांसारख्या कमी पाणी लागणाऱ्या पिकांची फेरपालट करावी. यामुळे लव्हाळ्याची वाढ कमी करण्यास मदत होते. तसेच भाताची पेंढी, उसाचे पाचट किंवा झाडांची पाने यांचे आच्छादन केले तर लव्हाळ्याला सूर्यप्रकाश कमी मिळतो आणि त्याची वाढ रोखण्यास मदत होते. प्लॅस्टिक आच्छादनामुळेही



सूर्यप्रकाश जमिनीतील कंदांपर्यंत पोहोचत नसल्याने त्यांची उगवण कमी होते. याशिवाय सघन लागवडीमुळेही तणाला वाढीसाठी कमी जागा मिळते.

खोल नांगरणी आणि मशागत :लव्हाळ्याच्या कंदांचे नियंत्रण करण्यासाठी उन्हाळ्यात खोल नांगरणी करावी. नांगरणीमुळे जमिनीतील कंद वर येतात. ते वेचून शेताबाहेर काढावेत आणि पूर्णपणे वाळवावेत. उन्हाळ्यात शेत ६ ते ८ आठवडे सोलरायझेशनसाठी ठेवता येते. त्यासाठी जमिनीवर प्लॅस्टिक फिल्म टाकल्याने जमिनीचे तापमान वाढते आणि लव्हाळ्याच्या कंदांवर परिणाम होतो. यासोबत कुळवाच्या पाळ्या देणे आणि सबसॉईलरच्या साह्याने जमिनीखाली पसरलेल्या मुळ्या व कंद नष्ट करणे उपयुक्त ठरते. उन्हाळी हंगामात खोल नांगरणी करावी किंवा धैंचा पिकाची लागवड करावी.रासायनिक तणनियंत्रण :लव्हाळ्याचे रासायनिक नियंत्रण करताना कोणत्या पिकात कोणते तणनाशक वापरायचे, याची शिफारस लक्षात घेणे महत्त्वाचे आहे.भात :रोपवाटिका आणि रोवणी केलेल्या भातामध्ये बिस्पायरिबॅक सोडिअम १० टक्के एस.सी. १०० मिलि प्रति एकर या प्रमाणात १५० लिटर पाण्यात मिसळून फवारावे. रोपवाटिका आणि रोवणीच्या भातात पिकाची अवस्था १० ते १५ दिवसांची असताना, तर पेरीव भातामध्ये पेरणीनंतर २० दिवसांनी फवारणी करावी रोवणी केलेल्या भातामध्ये क्लोरीमुरॉन इथाइल २५ टक्के डब्ल्यू.पी. १० ग्रॅम अधिक प्रसारक द्रव्य १५० लिटर पाण्यात प्रति एकर मिसळून फवारावे. रोवणीनंतर ५ ते १० दिवसांनी ही फवारणी करावी.

सोयाबीन :सोयाबीनमध्ये क्लोरीमुरॉन इथाइल २५ टक्के डब्ल्यू.पी. १५ ग्रॅम अधिक प्रसारक द्रव्य १५० लिटर पाण्यात प्रति एकर मिसळून पेरणीनंतर १५ दिवसांनी फवारावे. इमाझिथायपर १० टक्के एस.एल. ४०० मिलि प्रत एकर १५० लिटर पाण्यात मिसळून पेरणीनंतर ७ ते १४ दिवसांनी फवारावे.

कपाशी :लव्हाळा नियंत्रणासाठी कपाशीमध्ये ग्लुफोसिनेट अमोनियम १३.५ टक्के एस.एल. १ लिटर प्रति एकर १५० लिटर पाण्यात मिसळून पेरणीनंतर ४० दिवसांनी फवारावे. फवारणी करताना पंपाला संरक्षित कवच लावून फक्त दोन ओळींच्या मधील तणांवर फवारणी करावी. तणनाशक कपाशीच्या पिकावर पडणार नाही, याची काळजी घ्यावी.

तूर, मूग आणि उडीद :तूर, मूग आणि उडदामधील लव्हाळा तणासाठी इमाझिथायपर १० टक्के ई.सी. ३०० मिलि प्रति एकर १५० लिटर पाण्यात मिसळून पेरणीनंतर ७ ते १४ दिवसांनी फवारावे.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१८४१ : जॉन हॅम्प्टन यांनी व्हेनेशियन शैलीच्या खिडकीचे पेटंट केले.
१८८८ : विल्यम बरोज याने बेरजा मारणार्या यंत्राचे पेटंट घेतले.
१९११ : पॅरिसच्या लुव्र या संग्रहालयातुन लिओनार्डो-द-व्हिन्सी याचे 'मोनालिसा' हे जगप्रसिद्ध चित्र चोरीला गेले.
१९१५ : पहिल्या महायुद्धा दरम्यान इटलीने तुर्की विरुद्ध युद्धाची घोषणा केली.
१९३८ : इटली देशांतील शाळांमध्ये ज्यू शिक्षकांवर बंदी घालण्यात आली.
१९६५ : रोमानियाने संविधान स्वीकारले.
१९७२ : वन्यजीव संरक्षण कायद्यास मान्यता मिळाली.
१९८८ : भारत आणि नेपाळ यांच्या सीमेवर आलेल्या तीव्र स्वरूपाच्या भूकंपामुळे हजारो लोक मृत्युमुखी पडले.
१९९१ : लाटव्हियाने स्वत:ला (सोविएत युनियनपासुन) स्वतंत्र घोषित केले.
१९९३ : मंगळाच्या शोधमोहिमेसाठी पाठवण्यात आलेल्या 'मार्स ऑब्झर्व्हर' या यानाचा पृथ्वीशी संपर्क तुटला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७६५ : विल्यम (चौथा) इंग्लंडचा राजा (मृत्यू: २० जून १८३७)
१७८९ : ऑगस्टिन कॉशी फ्रेन्च गणितज्ञ (मृत्यू: २३ मे १८५७)
१८७१ : गोपाळ कृष्ण देवधर भारत सेवक समाजाचे एक संस्थापक सदस्य, 'सेवासदन' या संस्थेचे शिल्पकार, सहकारी चळवळीचे आद्य समर्थक (मृत्यू: १७ नोव्हेंबर १९३५)
१९०५ : भारतीय अभिनेते आणि निर्माते बिपीन गुप्ता यांचा जन्म. (मृत्यू: ९ सप्टेंबर १९८१)
१९०७ : भारतीय वकील आणि राजकारणी पी. जीवनवंश यांचा जन्म. (मृत्यू: १८ जानेवारी १९६५)
१९०९ : नागोराव घन:श्याम तथा 'ना. घ.' देशपांडे कवी (मृत्यू: १० मे २०००)
१९१० : नारायण श्रीधर बेन्द्रे आदिम कलेपासून चिनी चित्रकलेपर्यंत अनेक शैलीविशेष आत्मसात केलेले चित्रकार (मृत्यू: १८ फेब्रुवारी १९९२)
१९१५ : राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार सन्मानित प्रसिद्ध भारतीय उर्दू भाषिक कादंबरीकार, लघुकथा लेखक, आणि चित्रपट निर्माता इस्मत चुग़ताई यांचा जन्मदिन.
१९२२ : अमेरिकन खजिनदार शोधक आणि मेल फिशर मरीन हेरिटेज म्युझियमचे संस्थापक मेल फिशर यांचा जन्मदिन.
१९२४ : श्रीपाद अच्युत दाभोळकर 'प्रयोग परिवार' या संकल्पनेचे प्रवर्तक, गणितज्ञ आणि जमनालाल बजाज पुरस्काराने गौरवण्यात आलेले कृषीशास्त्रज्ञ (मृत्यू: ३०एप्रिल २००१)
१९२७ : भारतीय स्वातंत्र्यसेनानी, समाजवादी राजकारणी आणि उत्तरप्रदेश, उडीसा आणि पश्चिम बंगाल राज्याचे माजी राज्यपाल बी. सत्य नारायण रेड्डी यांचा जन्मदिन.
१९३४ : सुधाकरराव नाईक प्रसिद्ध भारतीय राजकारणी, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे सदस्य तसचं, महाराष्ट्र राज्याचे माजी १३ वे मुख्यमंत्री (मृत्यू: १० मे २००१)
१९३९ : बोत्स्वानाचा राष्ट्राध्यक्ष फेस्टस मोगे यांचा जन्म.
१९६१ : व्ही. बी. चन्द्रशेखर भारताचा फिरकी गोलंदाज
१९७१ : प्रसिद्ध भारतीय राजकारणी आणि अरुणाचल प्रदेशचे विद्यमान मुख्यमंत्री पेमा खांडू यांचा जन्मदिन.
१९७३ : गूगल चे सहसंस्थापक सर्गेइ ब्रिन यांचा जन्म.
१९८१ : कनेक्ट्यू चे सहसंस्थापक कॅमेरॉन विंकल्वॉस यांचा जन्म.
१९८६ : उसेन बोल्ट जमैकाचा धावपटू. यांनी अनेक विश्व विक्रम आपल्या नावे केली आहेत.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९३१ : 'गायनाचार्य' पं. विष्णू दिगंबर पलुसकर संगीतज्ञ, गायक, संगीतप्रसारक आणि गांधर्व महाविद्यालयाचे संस्थापक (जन्म: १८ ऑगस्ट १८७२)
१९४० : लिऑन ट्रॉट्स्की रशियन क्रांतिकारक (जन्म: ७ नोव्हेंबर १८७९)
१९४७ : बुगाटी कंपनी चे संस्थापक इटोर बुगाटी यांचे निधन. (जन्म: १५ सप्टेंबर १८८१)
१९७६ : पांडुरंग सातू नाईक आल्हाददायकता, कल्पकता व वास्तवता ही वैशिष्ट्ये असलेले चित्रपट छायालेखक
१९७७ : प्रेमलीला ठाकरसी एस. एन. डी. टी. विद्यापीठाच्या कुलगुरू
१९८१ : आचार्य दत्तात्रय बाळकृष्ण तथा 'काकासाहेब' कालेलकर गांधीवादी देशभक्त, शिक्षणतज्ञ, समाजसुधारक, इतिहासकार, बहुभाषा कोविद, रसिक, सखोल चिंतक, गुजराथ विद्यापीठाचे कुलगुरू (१९२८), राज्यसभा सदस्य (१९५२ १९५८), अनुसूचित जमातींच्या आयोगाचे अध्यक्ष (१९५३), गुजराथी साहित्यपरिषदेच्या अहमदाबाद अधिवेशनाचे अध्यक्ष (१९५९), हिन्दी विश्वकोश निर्मिती समितीचे सदस्य, साहित्य अकादमी पारितोषिक (१९६६) व फेलोशिप (१९७१) विजेते, पत्रकार व गुजराथी साहित्यिक(जन्म: १ डिसेंबर १८८५ सातारा, महाराष्ट्र)
१९९१ : गोपीनाथ मोहंती ज्ञानपीठ पारितोषिक विजेते ओरिया साहित्यिक (जन्म: २० एप्रिल १९१४)
१९९५ : सुब्रमण्यन चंद्रशेखर तार्यांचे आयुर्मान व त्यांचा शेवट यावरील संशोधनासाठी १९८३ मधे नोबेल पारितोषिक मिळालेले भारतीय-अमेरिकन खगोल वैज्ञानिक व गणिती. त्यांनी आपल्या आयुष्यातील बराच काळ कृष्णविवरांवरील संशोधनासाठी खर्च केला. यांचे काका सी. व्ही. रामन यांनाही भौतिकशास्त्रातील नोबेल पारितोषिक (१९३०) मिळाले आहे. भौतिकशास्त्रात नोबेल मिळवणारे हे दोघेच भारतीय वंशाचे आहेत. त्यांनी आपल्या आयुष्यातील बराच काळ कृष्णविवरांवरील संशोधनासाठी खर्च केला. जन्म: १९ आक्टोबर १९१०)
२००० : निर्मला गांधी समाजसेविका, महात्मा गांधींच्या स्नुषा (जन्म:)
२००० : विनायकराव कुलकर्णी स्वातंत्र्यलडःयातील व गोवा मुक्तीसंग्रामातील प्रमुख सेनानी आणि समाजवादी विचारवंत (जन्म:)
२००१ : मराठी रंगभूमीचा वारकरी म्हणून गौरविले गेलेले शं. ना. तथा दादासाहेब अंधृटकर (जन्म:)
२००१ : शरद तळवलकर आपल्या सदासतेज अभिनयाने मराठी रसिकांच्या मनावर प्रदीर्घकाळ प्रसन्नतेचे अधिराज्य गाजवणारे विनोदी कलाकार (जन्म: १ नोव्हेंबर १९२१)
२००४ : भारतीय उडिया भाषा कवी सच्चिदानंद राऊत यांचे निधन. (जन्म: १३ मे १९१६)
२००६ : बिस्मिला खाँ भारत रत्न, पद्मश्री व पद्मविभूषण पुरस्कार सन्मानित प्रसिद्ध भारतीय शहनाई वादक (जन्म: १९१६)
२००७ : ज्ञानपीठ पुरस्कार सन्मानित प्रसिद्ध भारतीय उर्दू भाषिक लेखिका कुर्रतुलऐन हैदर यांचे निधन.







# सिल्क, सीड आणि स्टीलची सिटी म्हणून आता जालना जिल्हा ओळखला जाणार-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

जालना। प्रतिनिधी

जालना जिल्ह्याची ओळख आता 'सिल्क, सीड आणि स्टील' अर्थात 'ट्रिपल एस सिटी' म्हणून निर्माण झाली असून, रेशीम उद्योगाच्या माध्यमातून जिल्ह्यात नव्या अर्थव्यवस्थेला चालना मिळत आहे. रेशीम शेतीला प्रोत्साहन देतानाच उत्पादनापासून प्रक्रिया, वस्त्रनिर्मिती, ब्रँडिंग आणि बाजारपेठेपर्यंतची संपूर्ण मूल्यसाखळी जालन्यात विकसित करण्यावर शासनाचा भर आहे. जालना लवकरच देशातील महत्त्वाचे रेशीम केंद्र म्हणून पुढे येईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.जालना येथे नव्याने उभारण्यात आलेल्या रेशीम बाजारपेठेच्या नवीन इमारत लोकार्पण सोहळ्यात ते बोलत होते. यावेळी पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन तथा पालकमंत्री पंकजा मुंडे, वस्त्रोद्योग राज्यमंत्री संजय सावकारे, लोकसभा सदस्य कल्याण काळे, जालना महानगर पालिकेच्या महापौर वंदना मगरे, आमदार अर्जुन खोतकर, आमदार बबनराव लोणीकर, आमदार नारायण कुचे, आमदार संतोष दानवे, आमदार हिकमत उढाण, माजी मंत्री राजेश टोपे, माजी आमदार



अरविंद चव्हाण, माजी आमदार विलास खरात, वस्त्रोद्योग विभागाच्या सचिव शैला ए., छत्रपती संभाजीनगर, विभागीय आयुक्त जी. श्रीकांत, रेशीम संचालनालय संचालक नागपूर विनय मुन, पोलीस महानिरीक्षक विरेंद्र कुमार मिश्र, जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, जि.प.चे मुख्य कार्यकारी अधिकारी कृष्णकांत कनवारिया, उपस्थिती होती.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, जालन्याला 'सिल्क सिटी' करण्याच्या दिशेने जिल्हा प्रशासनाने केलेले नियोजन कौतुकास्पद आहे. रेशीम उद्योगातून मोठ्या प्रमाणात अर्थव्यवस्था निर्माण होण्याची क्षमता आहे. नव्याने सुरू झालेल्या रेशीम बाजारपेठेमुळे उत्पादक शेतकऱ्यांना आपल्या मालासाठी थेट बाजारपेठ उपलब्ध झाली आहे. पहिल्या लिलावाला मिळालेला प्रतिसाद उत्साहवर्धक असून शेतकऱ्यांच्या उत्पादनाला अधिकाधिक चांगला दर मिळावा, यासाठी व्यापारी आणि संबंधित यंत्रणांनी प्रयत्न करावेत, असे आवाहन त्यांनी केले.

मागील अनेक वर्षांपासून शेतकरी कापूस आणि सोयाबीन या प्रमुख नगदी पिकांवर अवलंबून आहेत. या पिकांची उत्पादकता वाढविण्यासाठी प्रयत्न सुरू असले तरी शेतकऱ्यांना पर्यायी नगदी पिकांचा पर्याय देणे आवश्यक आहे. रेशीम शेती हा त्यासाठी अत्यंत चांगला पर्याय असून, अल्पभूधारक शेतकऱ्यांनाही यातून चांगले उत्पन्न मिळविण्याची संधी आहे. त्यामुळे अधिकाधिक शेतकऱ्यांना रेशीम शेतीकडे वळविण्यासाठी प्रशिक्षण आणि तंत्रज्ञानाची जोड देणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

केवळ रेशीम उत्पादन करून उपयोग नाही, तर त्यापुढील प्रक्रिया, धागानिर्मिती, वस्त्रनिर्मिती, साडी विणकाम, ब्रँडिंग आणि बाजारपेठ अशी संपूर्ण मूल्यसाखळी उभारणे महत्त्वाचे आहे. जालन्यात या दिशेने विविध प्रयोग सुरू आहेत. स्थानिक पातळीवर रेशीम वस्त्रनिर्मितीला चालना मिळाल्यास शेतकरी, महिला, विणकर, व्यापारी आणि युवकांसाठी रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होतील, असे मुख्यमंत्री म्हणाले. जालन्यातील महिलांनी रेशीमपासून साडी विणकाम सुरू केले असून त्यांचे कौशल्य आणि तयार होणाऱ्या वस्त्रांची गुणवत्ता उल्लेखनीय आहे. या महिलांना अधिक प्रशिक्षण, कौशल्यविकास आणि बाजारपेठ उपलब्ध करून दिल्यास रेशीम वस्त्रनिर्मितीला मोठी चालना मिळू शकते. पैठणीला जशी स्वतंत्र ओळख मिळाली, त्याच धर्तीवर पालकमंत्री पकंजा मुंडे यांनी सुचविल्यानुसार जालन्यात तयार होणाऱ्या सिल्कच्या उत्पादनांना 'जालनाई' या स्वतंत्र ब्रँडने ओळखले जाईल अशी घोषणा करुन, 'जालनाई' ब्रॅन्ड लोगोचे विमोचन केले. ज्याप्रमाणे पैठणी साडी जगप्रसिद्ध आहे, त्याच धर्तीवर स्थानिक महिलांच्या कौशल्याच्या जोरावर 'जालना सिल्क' ला देखील आंतरराष्ट्रीय स्तरावर एक मोठा ब्रँड म्हणून विकसित केले जाईल असे त्यांनी सांगितले.

जालना येथे ड्रायपोर्ट सुरू झाल्यामुळे रेशीम उत्पादनाला देशांतर्गत बाजारपेठे बरोबरच आंतरराष्ट्रीय बाजारपेठेशी जोडण्याची मोठी संधी उपलब्ध झाली आहे. एकेकाळी भारत जगाला रेशीम निर्यात करणारा देश होता. आता पुन्हा भारताने जागतिक रेशीम बाजारपेठेत आपले स्थान निर्माण करण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. जालना येथील रेशीम बाजारपेठ आणि ड्रायपोर्ट या दृष्टीने महत्त्वाची पायाभूत सुविधा ठरतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी प्रभावी तपास आणि जलद न्यायप्रक्रिया आवश्यक असून, गुन्हेगारांवर कायद्याचा वचक निर्माण होण्यासाठी अशा प्रकारची जलद आणि प्रभावी कार्यवाही आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. जालन्यात रेशीम (कोष) खरेदी केंद्राची सुरुवात करण्यात आली आहे. यामुळे आता शेतकरी बांधवांना न्याय मिळाला असून, पूर्वी रेशीम कोष विक्रीसाठी हजारो किलोमीटर दूर जावे लागणाऱ्या शेतकऱ्यांची मोठी सोय झाली आहे. आता जालन्यासाठी 'टेक्सटाईल पार्क' मंजुर करण्याची मागणी केली. प्रारंभी जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी जालना जिल्ह्यातील रेशीम शेती व उद्योगातील संधीबाबत सादरीकरणाद्वारे माहिती सादर केली. यावेळी कार्यक्रमास अपर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ, निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल, यावेळी उपस्थिती होती.

## गोलाईने घेतला मोकळा श्वास; फळगाड्यांना लोखंडी ग्रीलच्या मागे जागा निश्चित

लातूर। प्रतिनिधी

शहरातील मध्यवर्ती आणि अत्यंत वर्दळीचे ठिकाण असलेल्या गोलाई परिसरातील वाहतूक कोंडी व अतिक्रमणाच्या समस्येवर लातूर पोलिसांनी प्रभावी पाऊल उचलले आहे. नागरिकांना सुरक्षित व सुरळीत वाहतूक उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने शहर वाहतूक शाखा, गांधी चौक पोलीस ठाणे आणि लातूर महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने विशेष कारवाई करण्यात आली. प्रो. श्री. केंगले यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आलेल्या या कारवाईदरम्यान गोलाई परिसरातील रस्त्याच्या कडेला असलेले सर्व फळांचे गाडे लोखंडी ग्रीलच्या मागील निश्चित जागेत व्यवस्थित लावून घेण्यात आले. त्यामुळे मुख्य रस्त्याचा वाहतुकीसाठी असलेला भाग मोकळा झाला असून वाहनचालक तसेच पादचाऱ्यांना ये-जा करण्यासाठी अधिक जागा उपलब्ध झाली आहे.गोलाई परिसरात सतत मोठ्या प्रमाणात वाहनांची व नागरिकांची वर्दळ असते. रस्त्याच्या कडेला अनियोजित पद्धतीने फळगाडे उभे राहत असल्याने वाहतुकीस अडथळा निर्माण होऊन अनेकदा वाहनांची कोंडी होत होती. ही बाब लक्षात घेऊन फळ



विक्रेत्यांचा व्यवसाय बंद न करता, त्यांना निश्चित जागेत व्यवसाय करण्याची व्यवस्था करण्यात आली. त्यामुळे वाहतूक व्यवस्था सुरळीत ठेवतानाच विक्रेत्यांच्या उपजीविकेचाही विचार करण्यात आला आहे.

या कारवाईमुळे गोलाई परिसरातील रस्त्याची उपलब्ध जागा वाढली असून वाहतुकीचा प्रवाह अधिक सुरळीत होण्यास मदत होणार आहे. तसेच पादचाऱ्यांना रस्ता ओलांडताना व परिसरातून ये-जा करताना होणारी गैरसोय कमी होणार आहे. गोलाई हा लातूर शहराच्या वाहतुकीचा महत्त्वाचा केंद्रबिंदू असल्याने या ठिकाणी वाहतूक शिस्त कायम ठेवण्यासाठी ही कारवाई महत्त्वपूर्ण मानली जात आहे.लातूर शहरातील वाहतूक व्यवस्था अधिक सुरक्षित, शिस्तबद्ध आणि सुरळीत करण्यासाठी पोलीस विभाग, महानगरपालिका आणि संबंधित घटकांच्या समन्वयातून यापुढेही आवश्यक उपाययोजना करण्यात येणार आहेत. नागरिकांनी तसेच व्यावसायिकांनी प्रशासनाने निश्चित केलेल्या जागेचा वापर करून रस्त्यावर अतिक्रमण अथवा वाहतुकीस अडथळा निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी, असे आवाहन लातूर पोलिसांकडून करण्यात आले आहे. संयुक्त कारवाईमुळे गोलाई परिसर अधिक मोकळा, स्वच्छ आणि शिस्तबद्ध दिसू लागला असून, ''लातूरच्या गोलाईने घेतला मोकळा श्वास'' अशी भावना नागरिकांमधून व्यक्त होत आहे.

## ग्रामीण पोलिसांची हॉटेलवर धडक कारवाई; अनैतिक व्यवसाय प्रकरणी एकास अटक

लातूर । प्रतिनिधी

उदगीर ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीत सुरू असलेल्या अनैतिक व्यवसायाविरुद्ध पोलिसांनी धडक कारवाई करत एका आरोपीस अटक केली आहे. सदर कारवाई अशोका पॅलेस हॉटेल, नांदेड रोड, उदगीर येथे करण्यात आली.दि. १३ ऑगस्ट २०२६ रोजी सायंकाळी सुमारे ७.०० वाजता उदगीर ग्रामीण पोलिसांना मिळालेल्या माहितीनुसार अशोका पॅलेस हॉटेल येथे कारवाई करण्यात आली. या ठिकाणी आरोपी अहमद जलील बागवान (वय ३३ वर्षे, रा. बोधन नगर, जळकोट रोड, उदगीर) हा स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी महिलांना हॉटेलवर बोलावून आणत असल्याचे तसेच पैशांचे आमिष दाखवून त्यांच्याकडून वेश्याव्यवसाय करून घेत असल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले.याप्रकरणी पोलीस अंमलदार संदीप बाबुराव केन्द्रे, यांनी दिलेल्या फिर्यादीवरून गुन्हा रजि. नं. ५६९/२०२६ अन्वये अनैतिक व्यवसाय प्रतिबंध अधिनियम १९५६ चे कलम ३, ४, ५, ७ सह भारतीय न्याय संहितेचे कलम १४३ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.सदर गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस निरीक्षक श्री. दिलीप गाडे, उदगीर ग्रामीण पोलीस ठाणे हे करीत आहेत. सदर प्रकरणातील एकूण पाच पीडित महिलांना सुधार गृहात ठेवण्यात आलेले आहे.सदरची कारवाई वरिष्ठांचे मार्गदर्शनात उपविभागीय पोलीस अधिकारी, श्री भातलवंडे. पोलीस निरीक्षक श्री. दिलीप गाडे तसेच पोलीस निरीक्षक श्री. भुसनूर, उदगीर शहर यांनी व पथकाने केली आहे.अनैतिक व्यवसायासह अवैध कृत्यांना आळा घालण्यासाठी उदगीर ग्रामीण पोलिसांकडून हॉटेल, लॉज व इतर संवेदनशील ठिकाणांवर लक्ष ठेवून आवश्यक ती कायदेशीर कारवाई सुरूच राहणार आहे.

## भगवान विद्यालयात ८० वा स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा

पाथर्डी । प्रतिनिधी

खरवंडी कासार येथील भगवान विद्यालयात ८० वा स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला सकाळी खरवंडी कासार उपनगरातून तिरंगा प्रभात फेरी काढण्यात आली लेझीमवर गीत कवायत देशभक्तीपर गीतावर केलेले मनमोहक नृत्य विद्यार्थ्यांनी हिंदुस्तानचा इतिहास गौरवणारे केलेली भाषणे कार्यक्रमाचे आकर्षण ठरले त्याचबरोबर महाराष्ट्र राज्य शिष्यवृत्ती राज्यस्तरीय स्पर्धेमध्ये शाळेतील विद्यार्थी पात्र ठरले गतवर्षी इयत्ता दहावी मध्ये प्रथम आलेली वैष्णवी पंपू गोल्हार या विद्यार्थिनीचा सन्मान करण्यात आला तसेच खरवंडी कासार परिसरातील स्वामीनाथ गोपाळघरे व डॉ.हरी बटुळे यांच्यावतीने भगवान विद्यालयातील अनाथ निराधार व गोरगरीब विद्यार्थ्यांना शालेय पुस्तके वह्या पेन तसेच जेवणाचे टिफिन डबे वाटप करण्यात आले या कार्यक्रमासाठी




भगवानगडाचे प्रतिनिधी ह.भ.प.राजाराम महाराज फड भास्कर खेडकर पांडुरंग आंधळे गंगाधर भालेराव मुख्याध्यापक नवनाथ बांगर निलेश अंदुरे संतोष कुलकर्णी सुरेश थोरात धर्मराज शिरसाठ स्वामिनी कीर्तने शिवाजी वारे अनिल खंडागळे बाबासाहेब अंदुरे प्रदीप अंदुरे चेतन आंधळे विठ्ठल कोळी गणेश आंधळे अशोक स्वामी बाळासाहेब गरकळ सचिन गायकवाड तसेच विद्यार्थी खरवंडी कासार परिसरातील पालक मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.

## बाजार समितीत गाळ्यांचा लिलाव पारदर्शक पद्धतीने करण्याची मागणी

पाथर्डी। प्रतिनिधी

पाथर्डी तालुक्यातील शेतकऱ्यांची कामधेनू असलेल्या पाथर्डी कृषी उत्पन्न बाजार समिती अंतर्गत गाळ्यांचा लिलाव होण्याची प्रक्रिया राबविण्यात येणार असल्याने सदरील गाळ्यांचा लिलाव शासन निर्णय सहकार व पणन विभाग यांच्या नियम व अटीला धरून व पारदर्शक पद्धतीने करण्याची मागणी कृषी उत्पन्न बाजार समितीतील आडत व्यापारी गोरक्ष ढाकणे यांनी लेखी निवेदनाद्वारे पाथर्डी कृषी उत्पन्न बाजार समिती सचिव व सभापती यांच्याकडे केली आहे निवेदनात म्हटल्याप्रमाणे पाथर्डी कृषी उत्पन्न बाजार समिती अंतर्गत गाळ्यांचा लिलाव शेती कृषी पूरक व्यवसायांच्या साठी व्हावा इतर कुठल्याही व्यवसायासाठी गाळ्यांचा लिलाव करण्यात येऊ नये गाळयांचा लिलाव करताना पात्रताधारक गाळा व्यवसायिकाकडून कृषी शेती पूरक व्यवसाय न करता इतर व्यवसाय केल्यास कायदेशीर कारवाई करण्याची मागणी तसेच गाळ्यांचा लिलाव करताना करारनामा दिलेला ठेका अमानत रक्कम वृत्तपत्रामध्ये जाहिरातीत स्पष्ट नियम व अटी शर्तींचा उल्लेख करून सर्व माहिती सार्वजनिक करण्याची मागणी देखील करण्यात आली आहे.

## मराठवाड्यातील पुढच्या पिढीला दुष्काळाचं तोंडही पाहू देणार नाही-फडणवीस

### भाजप जिल्हा कार्यालय म्हणजे कार्यकर्त्यांचा हक्काचं घर

जालना। प्रतिनिधी

'मराठवाड्याने अनेक दशके दुष्काळाच्या तीव्र झळा सहन केल्या आहेत. या पिढीने हा दुष्काळ सोसला, पण मराठवाड्याच्या पुढच्या पिढीला दुष्काळाचं तोंडही पाहू देणार नाही. संपूर्ण मराठवाडा कायमस्वरूपी दुष्काळमुक्त करण्याचा आमचा ठाम संकल्प आहे,' अशी महत्त्वपूर्ण घोषणा राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी येथे केली. यावेळी बोलताना ते म्हणाले की हे जालना जिल्ह्याचे भाजप कार्यालय म्हणजे भाजप कार्यकर्त्यांचे हक्काचं घर आहे. या ठिकाणी सर्व कार्यकर्त्यांची मुख्य कार्यालय राहणार आहे. जालना जिल्हा भाजपच्या नूतन मध्यवर्ती कार्यालयाचा भूमिपूजन सोहळा आणि शेतकरी मेळावा १४ ऑगस्ट रोजी जालना येथे पार पडला. या वेळी आयोजित जाहीर सभेत ते बोलत होते. या सभेस भाजपाचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण, माजीमंत्री रावसाहेब पा. दानवे, आ. नारायण कुचे, आ. संतोष दानवे, आ. बबनराव लोणीकर, भास्करराव आबा दानवे, माजी आमदार विलासराव खरात, कैलास गोरंट्याल,



महापौर वंदना मगरे, जिल्हा मध्यवर्ती बँकेचे अध्यक्ष राहुल भैया लोणीकर , देविदास कुचे,उपमहापौर राजेश राऊत व इतरांची उपस्थिती होती.

यावेळी बोलतांना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, 'पश्चिम वाहिनी नद्यांचे ८० टीएमसी पाणी कोकणातून थेट मराठवाड्यात आणि गोदावरीच्या खोऱ्यात आणले जाणार आहे. याशिवाय कोल्हापूर व सांगली जिल्ह्यातील पुराचे पाणी उजनी धरणात वळवण्यात येईल. या जलप्रकल्पांमुळे मराठवाड्याचा पाण्याचा प्रश्न मुळापासून सुटण्यास मदत होईल.' जालन्यातील औद्योगिक प्रगतीचा उल्लेख करत फडणवीस म्हणाले, 'समृद्धी महामार्गाची पायाभरणी करतानाच छत्रपती संभाजीनगर आणि जालना हे महाराष्ट्रातील उद्योगांचे पुढील मुख्य केंद्र ('इंडस्ट्री मॅग्नेट') बनतील, असा विश्वास मी व्यक्त केला होता. आज ते प्रत्यक्षात दिसत आहे. ड्रायपोर्टमुळे कनेक्टिव्हिटी वाढली असून जालन्याला 'सिल्क सिटी' बनवण्यासाठी आज पहिली बाजारपेठ सुरू करण्यात आली आहे. आता जालन्याची ओळख '३ड' म्हणजेच स्टील सीड्स आणि सिल्क अशी राहील.' थकीत बिल माफी: राज्यातील तब्बल ५५ हजार शेतकऱ्यांचे थकीत वीजबिल पूर्णपणे माफ करून त्यांना बेबाकी (नो-ड्यूज) प्रमाणपत्र दिले जाईल. 'आम्ही काँग्रेससारखी लबाडी केली नाही. सध्या ७६ टक्के शेतकऱ्यांना दिवसा वीज दिली जात असून, सौर कृषी योजनेच्या माध्यमातून लवकरच १०० टक्के शेतकऱ्यांना दिवसा १२ तास मोफत वीज दिली जाईल.' दिलेले वचन पाळत सरकारने शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी दिली आहे. 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना' कधीही बंद होणार नाही. ५० लाख महिला 'लखपती दीदी' झाल्या असून हे उद्दिष्ट १ कोटींपर्यंत नेण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला. 'जालना जिल्ह्याने नेहमीच भाजपला खंबीर साथ दिली आहे, त्यामुळे या जिल्ह्याच्या आणि तरुणांच्या विकासात निधीची कोणतीही कमतरता भासू दिली जाणार नाही,' अशी ग्वाही देऊन मुख्यमंत्र्यांनी दिली.

## वृद्ध कलावंताचे अनुदान सुरू करण्यासाठी उपोषण



जालना। प्रतिनिधी

खरे वृद्ध कलावंत यांचं अनुदान चालू करण्यासाठी जिल्हा परिषद कार्यालयासमोर उपोषण सुरू करण्यात आले. या संदर्भात उपोषण करते म्हणाले की खोटे वृद्ध कलावंत यांना अनुदान सुरू असून खरे वृद्ध कलावंत वंचित असल्याचे ते म्हणाले महाराष्ट्र सरकारने तत्काळ निर्णय घेऊन वृद्ध कलावंत यांचे अनुदान मंजूर करण्यात यावे अशी मागणी करण्यात आली आहे.

वंचित वृद्ध कलावंत १४/०८/२०२६ पासून परिषद कार्यालय जालना येथे आमरण उपोषणास बसले आहे. याबाबत जिल्हा प्रशासनाने दखल न घेतल्यामुळे जाग्यावरच भजन कीर्तन सुरू केले.

याबाबत वृद्ध कलावंताच्या मागण्या वृद्ध कलावंताच्या मानधनात वाढ करून ११०००/- रुपये मासिक मानधन देण्यात यावे. वृद्ध कलावंताचा जिल्हास्तरीय मानधन मंजुरी इस्टांक १०० वरून २०० करण्यात यावा.मानधन निवड समिती स्थापन करून मानधन प्रस्ताव निकाली काढण्यात यावे.मूळ कागदपत्रे तपासूनच अंतिम यादी तयार करण्यात यावी जेणेकरून पात्र वृद्ध कलावंतांना न्याय मिळेल. अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली.

# पशुवैद्यकीय महाविद्यालय मराठवाड्याच्या प्रगतीची नवी पायाभरणी ठरेल -ना. सुनेत्राताई पवार

## परळीचा सकारात्मक बदल व भावी पिढीचे भविष्य उज्वल करता येतेय याचा आनंद -ना पंकजाताई मुंडे

**परळी वैजनाथ । प्रतिनिधी**

मराठवाडा ही संतांची संस्कृतीची आणि कष्टकऱ्यांची भूमी आहे. शेतीला आधार देणाऱ्या पशुधनाची काळजी घेणे ही आजच्या काळाची गरज आहे. परळीत उभे राहणारे हे महाविद्यालय मराठवाड्यातील विद्यार्थ्यांसाठी उच्च दर्जाच्या पशुवैद्यकीय शिक्षणाचे मोठे केंद्र ठरेल. या दृष्टीने मराठवाड्याच्या प्रगतीची ही नवी पायाभरणी असल्याचे प्रतिपादन उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्राताई अजित पवार यांनी केले.समृद्ध शेतकरी, सुदृढ पशुपालन आणि पशुसंवर्धनातून स्वावलंबी उद्योजक युवक घडणार असून त्या दृष्टिकोनातून शासन प्रयत्नशील असल्याचे पशुसंवर्धन मंत्री ना पंकजाताई मुंडे यांनी सांगितले. तर बारामती येथील पशुवैद्यकीय महाविद्यालयाला अजित दादा पवार यांचे तर परळीतील पशुवैद्यकीय महाविद्यालयाला लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांचे नाव द्यावे अशी मागणी आ. धनंजय मुंडे यांनी आज येथे केली.

राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना पंकजाताई मुंडे यांच्या दूरदृष्टीतून निर्माण होत असलेल्या परळी वैजनाथ येथील ६३४ कोटी रुपये खर्चाच्या पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालयाचा कोनशिला समारंभ व भूमिपूजनाचा शानदार सोहळा आज मोठया थाटात संपन्न झाला, त्यावेळी त्या बोलत होत्या. स्वातंत्र्य दिनाच्या दिवशी प्रचंड जनसागराच्या उपस्थित व उत्साहपूर्ण वातावरणात पालकमंत्री सुनेत्रा ताई पवार यांच्या शुभहस्ते व ना. पंकजाताई मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली हे भूमिपूजन पार पडले. करण्यात आले. याप्रसंगी व्यासपीठावर माजी



मंत्री आमदार धनंजय मुंडे, माजी खासदार डॉ.प्रितमताई मुंडे, आ. नमिता मुंदडा, माजी आमदार संजय दौंड, बदामराव पंडित, नगराध्यक्षा पद्मश्री धर्माधिकारी, पशु वैद्यक विज्ञान विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन पाटील, पशुसंवर्धन विभागाचे सचिव डॉ. एन. रामास्वामी, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा परिषदेचे ◀◀ पान २ वर

### मंत्रीपदाचा उपयोग परळीसाठी करता आला याचा आनंद - ना पंकजाताई मुंडे

बारामती येथील कृषी प्रदर्शनात अजितदादांनी या प्रकल्पाची घोषणा केली होती. या पशुवैद्यकीय महाविद्यालयाच्या माध्यमातून परळी परिसरात मोठ्या प्रमाणावर विकासात्मक व सकारात्मक बदल घडणार आहेत. पशुपालकांना त्यांच्या व्यवसायासाठी मदत व्हावी यासाठी ५० टक्क्यांपर्यंत अनुदान देण्याची शासनाची भूमिका आहे.पशुसंवर्धन खात्याची मंत्री म्हणून परळी व परिसरासाठी येणाऱ्या पिढ्यांचे उज्वल भविष्य घडावे या दृष्टिकोनातून आपल्याला काहीतरी करता येत असल्याचा मनोमन प्रचंड आनंद असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या माध्यमातून महाराष्ट्रात मुख्यमंत्री पशुधन उद्योग योजना प्रभावीपणे राबविण्यात येणार आहे.परळीतील या महत्त्वाकांक्षी प्रकल्पा मुळे या भागाच्या विकासाचा नवा अध्याय लिहला जात आहे. परळीच्या विकासाच्या दृष्टीने पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय हा महत्त्वाचा टप्पा आहे. शिक्षण, पशुसंवर्धन, संशोधन, रोजगार आणि शेतकरी-पशुपालकांच्या आर्थिक उन्नतीला या प्रकल्पामुळे नवी दिशा मिळणार आहे असे पंकजाताई मुंडे यांनी यावेळी सांगितले. या पशुवैद्यकीय महाविद्यालयाचे काम पूर्ण क्षमतेने निर्धारित वेळेत गुणवत्तेचे आणि दर्जेदार होण्याच्या दृष्टीने काम करावे असे निर्देश त्यांनी यावेळी दिले.समृद्ध शेतकरी, सुदृढ पशुधन आणि स्वावलंबी मराठवाडा घडविण्याचा आपला संकल्प असल्याची वही त्यांनी यावेळी दिली.

# पीक विम्याचा प्रश्न महिनाभरात निकाली काढा; अन्यथा माजलगाव तहसील कार्यालय अथवा बीड कलेक्टर कार्यालयावर प्रचंड मोर्चा

माजलगाव । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या रखडलेल्या पीक विम्याच्या प्रश्नावर आता शेतकरी नेते भाई गंगाभिषण थावरे यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. येत्या महिन्यात पीक विम्याचा प्रश्न निकाली काढून शेतकऱ्यांच्या खात्यावर विम्याची रक्कम जमा करण्यात आली नाही, तर मराठवाडा मुक्ती संग्राम दिनी माजलगाव तहसील कार्यालय अथवा बीड येथील जिल्हाधिकारी कार्यालयावर शेतकऱ्यांचा प्रचंड मोर्चा काढण्यात येईल, असा इशारा भाई गंगाभिषण थावरे यांनी दिला आहे.




बीड जिल्ह्यातील हजारो शेतकरी पीक विम्याच्या प्रतीक्षेत आहेत. खरीप हंगामात शेतकऱ्यांनी विम्याचा हप्ता भरूनही नुकसान झाल्यानंतर अपेक्षित विमा भरपाई अद्याप मिळालेली नाही. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये मोठ्या प्रमाणात नाराजी असून शासनाने या प्रश्नाकडे गांभीर्याने पाहण्याची मागणी होत आहे. शेतकऱ्यांनी वेळेत विमा भरला, नुकसान झाल्यानंतर पंचनामे झाले; मात्र विम्याची रक्कम मिळण्यासाठी शेतकऱ्यांना अजूनही प्रतीक्षा करावी लागत आहे. शासनाने आता आश्वासनांपेक्षा प्रत्यक्ष कृती करावी, अशी भूमिका शेतकरी नेते भाई गंगाभिषण थावरे यांनी मांडली. येत्या महिन्यात पीक विम्याचा प्रश्न मार्गी लागला नाही, तर आंदोलनाची दिशा अधिक तीव्र करण्यात येईल. मराठवाडा मुक्ती संग्राम दिनी माजलगाव तहसील कार्यालय अथवा बीड कलेक्टर ऑफिस येथे मोठ्या संख्येने शेतकऱ्यांचा प्रचंड मोर्चा काढण्यात येईल, असा स्पष्ट इशारा त्यांनी दिला. शेतकऱ्यांच्या खात्यावर पीक विम्याची रक्कम तातडीने जमा करावी, ◀◀ पान २ वर

# डोंगरकिन्ही गटातील शेतकऱ्यांनी आधार प्रमाणीकरण, 'ग्रीस्टॅक' नोंदणी करावी -ॲड.प्रकाश कवठेकर

बीड । प्रतिनिधी

शासनाच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्मभूमी योजना २०२६ अंतर्गत डोंगरकन्हि गटातील पात्र शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ मिळण्यासाठी आवश्यक असलेली आधार प्रमाणीकरण प्रक्रिया आणि 'ग्रीस्टॅक' नोंदणी तातडीने पूर्ण करून घ्यावी, असे आवाहन माजी जिल्हा परिषद सदस्य ड.प्रकाश कवठेकर यांनी केले आहे.



शेतकऱ्यांच्या आर्थिक अडचणी विचारात घेऊन शासनामार्फत विविध कल्याणकारी योजना राबवल्या जात आहेत. कर्जमाफी, पीक कर्ज, विविध अनुदाने, नैसर्गिक आपत्तीची मदत आणि इतर शासकीय योजनांचा थेट लाभ मिळवण्यासाठी शेतकऱ्यांची आधार पडताळणी तसेच ग्रीस्टॅक प्रणालीवरील डिजिटल नोंदणी पूर्ण असणे अनिवार्य करण्यात आले आहे. डोंगरकन्हि गटातील बहुतांश शेतकरी पूर्णपणे शेतीवर अवलंबून आहेत. आर्थिक अडचणींच्या काळात मिळणारी कर्जमाफी त्यांच्यासाठी मोठा दिलासा ठरू शकते. परंतु केवळ तांत्रिक प्रक्रिया वेळेत पूर्ण न झाल्यामुळे पात्र असूनही एखादा शेतकरी लाभापासून वंचित राहण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे शेतकऱ्यांनी याकडे गांभीर्याने पाहून आपली कागदपत्रे आणि नोंदणी ◀◀ पान २ वर

### गावनिहाय विशेष शिबिरांची मागणी

ग्रामीण भागातील अनेक शेतकऱ्यांना ऑनलाइन प्रक्रिया, ग्रीस्टॅक नोंदणी आणि आधार प्रमाणीकरण करताना तांत्रिक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. ही बाब लक्षात घेऊन प्रशासनाने डोंगरकन्हि गटातील प्रत्येक गावात विशेष शिबिरांचे आयोजन करावे आणि शेतकऱ्यांना थेट मदत व मार्गदर्शन उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी ॲड.प्रकाश कवठेकर यांनी प्रशासनाकडे केली आहे.

# डॉ ओमप्रकाश शेटेंच्या वाढदिवसानिमित्त अन्नदानाचा स्तुत्य सामाजिक उपक्रम

माजलगाव । प्रतिनिधी

आयुष्यमान भारत मिशन महाराष्ट्र समितीचे अध्यक्ष डॉ.ओमप्रकाश शेटे यांच्या वाढदिवसानिमित्त मूकबधिर निवासी विद्यालय, माजलगाव येथे अन्नदानाचा स्तुत्य सामाजिक उपक्रम आयोजित करण्यात आला.

वाढदिवसाचा आनंद केवळ उत्सवापुरता मर्यादित न ठेवता समाजातील गरजू व विशेष विद्यार्थ्यांसोबत आनंद वाटून घेण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.यावेळी विद्यालयातील विद्यार्थ्यांना अन्नदान करण्यात आले.या सामाजिक उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंदाचे वातावरण निर्माण झाले.सामाजिक बांधिलकी जपत राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचे उपस्थितांनी कौतुक केले. वाढदिवसाच्या निमित्ताने गरजू घटकांची सेवा करणे हीच खरी मानवसेवा आहे, असा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.या स्तुत्य सामाजिक उपक्रमाचे आयोजक अनिल राधे कांबळे यांनी पुढाकार घेतला. समाजहिताच्या विविध उपक्रमांतून सामाजिक बांधिलकी जपण्याचा संकल्प यावेळी व्यक्त करण्यात आला.

**मूकबधिर निवासी विद्यालयातील विद्यार्थ्यांना अन्नदान**



# छोटेवाडी ग्रामपंचायतीत स्वातंत्र्यदिनानिमित्त ध्वजारोहण

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील छोटेवाडी, रामनगर ग्रुप ग्रामपंचायत कार्यालयात स्वातंत्र्यदिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.प्रथमतः महात्मा गांधी व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पुजन करून लोकनियुक्त सरपंच सविता अंगदराव कटके यांच्या शुभहस्ते ध्वजारोहण करण्यात आले.



ग्रामसेवक डि.के.ताटे,उपसरपंच बाळासाहेब चव्हाण,ग्रामपंचायत सदस्य शारदा कटके,उषा इंगळे, रूकमीण चांदणे, ज्ञानेश्वर बागल, शालेय समिती उपाध्यक्ष संतोष दळवी व गावातील प्रतिष्ठित नागरिक,अंगणवाडीताई, महिला बचतगट सदस्य, शिक्षकवर्ग, विद्यार्थी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या वेतनाबाबत मा. उपमुख्यमंत्री यांना निवेदन

बीड । प्रतिनिधी

याबाबत सविस्तर असे की, शासकीय विश्रामगृह बीड येथे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वेतनाबाबत अविनाश तांदळे राज्य उपाध्यक्ष, प्रहार शिक्षक संघटना महाराष्ट्र राज्य यांनी मा. श्रीमती सुनेत्राताई पवार उपमुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री बीड तसेच मा.ना.श्री धनंजय मुंडे यांना श्री वैद्यनाथ विद्यालय ( माध्यमिक ) परळी वैजनाथ या शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे वेतन मागील नऊ महिन्यापासून प्रलंबित असून सर्व कर्मचाऱ्यांवर उपासमारीची वेळ आलेली असून आर्थिक बाबतीत



अडचणींना सामोरे जावे लागत आहे. याबाबत चर्चा करून निवेदन देण्यात आले.

तसेच शिक्षणाधिकारी माध्यमिक यांनी तीन दिवसात पगाराचा प्रश्न सोडवू याबाबत लेखी आश्वासन दिले होते परंतु एक महिना होऊनही दिलेल्या आश्वासनाची पूर्तता झालेली नाही तसेच विद्यार्थ्यांचे ◀◀ पान २ वर

# राहुल दुबालेच्या हातात शस्त्रे, तोंडात धमक्या; कारवाई कधी ? उपमुख्यमंत्र्यांकडे प्रशांत वासनिकांनी मांडले गंभीर आरोप

बीड । प्रतिनिधी

विद्यार्थी आंदोलक 'कॉकरोच जनता पार्टी'चे प्रमुख अभिजीत दिपके यांच्या विरोधात धमकीवजा वक्तव्य केल्याचा आरोप तसेच सार्वजनिक ठिकाणी तलवार व पिस्तूल घेऊन दहशत निर्माण केल्याच्या आरोपावरून तथाकथित 'पोलीस बॉईज' संघटनेचा कार्यकर्ता राहुल दुबाले याला तात्काळ अटक करून त्याच्यावर आर्म क्टनुसार गुन्हा दाखल करावा, अशी आक्रमक मागणी करण्यात आली आहे.या मागणीचे निवेदन आंबेडकरी कार्यकर्ते प्रशांत वासनिक यांनी १५ ऑगस्ट रोजी बीड येथे राज्याच्या उपमुख्यमंत्री तथा बीडच्या पालकमंत्री सुनेत्राताई पवार यांना दिले.निवेदनात राहुल दुबाले याच्यावर गंभीर आरोप करण्यात आले असून, त्याला गृहविभाग समिती सदस्य पदावरूनही



तात्काळ हटवावे,अशी मागणी करण्यात आली आहे.तसेच आवश्यकता नसताना शस्त्र परवाना देण्यात आला असल्यास संबंधित परवाना देणाऱ्या अधिकाऱ्याचीही चौकशी करण्यात यावी,अशी मागणी वासनिक यांनी केली आहे.'पोलीस बॉईज' संघटनेच्या माध्यमातून समाजातील वातावरण बिघडविण्याचे प्रकार सुरू असल्याचा आरोपही निवेदनातून करण्यात आला आहे.राहुल दुबालेच्या कथित बेताल व धमकीवजा वक्तव्याची दखल घेऊन पोलीस अधीक्षकांनी तत्काळ कायदेशीर कारवाई करणे अपेक्षित होते.मात्र,अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नसल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे.सार्वजनिक ठिकाणी शस्त्रांचे प्रदर्शन करून दहशत निर्माण करणाऱ्यांवर प्रशासनाने कठोर कारवाई करावी,अन्यथा अशा प्रकारांना प्रोत्साहन मिळून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो,असा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे. त्यामुळे या संपूर्ण प्रकरणाची तातडीने चौकशी करून संबंधितांवर कठोर कायदेशीर कारवाई करावी,अशी मागणी प्रशांत वासनिक यांनी केली आहे.

# शिवसैनिकांच्या अडचणी सोडवण्यासाठी कोणत्याही क्षणी फोन करा; कामासाठी मी सदैव तुमच्या पाठीशी - संपर्कमंत्री ना भरतशेठ गोगावले

गेवराई । प्रतिनिधी

शिवसेना कार्यकर्ता संवाद मेळावा व पक्षप्रवेश सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. संपर्कमंत्री तथा मंत्री भरतशेठ गोगावले यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या मेळाव्याला शिवसैनिक, पदाधिकारी व विविध गावांतील कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली. या मेळाव्यामुळे गेवराई विधानसभा मतदारसंघात शिवसेनेच्या संघटनात्मक ताकदीला नवचैतन्य मिळाल्याचे चित्र पाहायला मिळाले.

यावेळी बोलताना मंत्री भरतशेठ गोगावले म्हणाले की, ज्या ठिकाणी आपल्या पक्षाचा आमदार नसतो, त्या ठिकाणी शिवसैनिक व कार्यकर्त्यांना काम करताना असंख्य



**गेवराईत शिवसेनेचा दणदणीत कार्यकर्ता संवाद मेळावा; विविध पक्षांतील कार्यकर्त्यांचा शिवसेनेत जाहीर प्रवेश**

अडचणींचा सामना करावा लागतो. या अडचणी दूर करण्यासाठीच मला बीड जिल्ह्याचा संपर्कमंत्री म्हणून जबाबदारी देण्यात आली आहे. यापुढे कोणत्याही शिवसैनिकाचे कोणतेही काम असेल, तर कोणत्याही क्षणी मला फोन करा किंवा मला प्रत्यक्ष भेटा. तुमच्या अडचणी सोडवण्यासाठी मुख्यमंत्री तथा शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथ शिंदे साहेब यांच्या माध्यमातून सर्वतोपरी प्रयत्न करणार आहे, असा स्पष्ट शब्दांत विश्वास त्यांनी व्यक्त केला.

शिवसैनिकांनी कोणत्याही परिस्थितीत खचून न जाता संघटन मजबूत करण्यासाठी गावागावात काम करण्याचे आवाहनही मंत्री गोगावले यांनी केले. सामान्य कार्यकर्त्याला सन्मान आणि त्याच्या प्रश्नांना प्राधान्य देणे हीच शिवसेनेची भूमिका असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

दहा-वीस कार्यकर्त्यांपासून आज शेकडोंची गर्दी; शिवसेनेच्या वाढत्या ताकदीचा अभिमान - अँड. चंद्रकांत आप्पा नवले

◀◀ पान २ वर

# आ. सुरेश धस यांच्या पुढाकाराचा सकारात्मक परिणाम; महाआरोग्य शिबिरातून रुग्णांना नवजीवन

## शिरूर कासार तालुक्यातील वारणी येथील सुभाष केदार यांच्यावर ५ लाखांपर्यंतची मणक्याची शस्त्रक्रिया मोफत

आष्टी । प्रतिनिधी

मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त आरोग्यदूत आमदार सुरेश आण्णा धस यांच्या संकल्पनेतून ६ ऑगस्ट रोजी आष्टी येथे आयोजित करण्यात आलेल्या मुख्यमंत्री महाआरोग्य शिबिराचा सकारात्मक परिणाम आता प्रत्यक्ष रुग्णांच्या जीवनावर दिसून येत आहे. शिबिरात तपासणी करून निवड झालेल्या गरजू रुग्णांवर विविध रुग्णालयांत मोफत उपचार व शस्त्रक्रिया करण्यात येत आहेत. याच उपक्रमातून शिरूर कासार तालुक्यातील वारणी येथील सुभाष देवराव केदार यांच्यावर अहिल्यानगर येथील साईदीप हॉस्पिटलमध्ये मणक्याच्या गादीची शस्त्रक्रिया पूर्णपणे मोफत करण्यात आली.



वारणी येथील सुभाष केदार हे महाआरोग्य शिबिरासाठी आले असता त्यांच्या आजाराची तातडीने दखल घेण्यात आली. कार्यकर्ते श्रीराम केदार यांनी त्यांच्या उपचाराबाबत आमदार सुरेश धस यांच्याकडे माहिती दिल्यानंतर त्यांनी तात्काळ आवश्यक मदत व उपचाराची व्यवस्था करण्याच्या सूचना दिल्या. त्यानुसार सुभाष केदार यांना १० ऑगस्ट २०२६ रोजी अहिल्यानगर येथील साईदीप हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. त्यांच्यावर मणक्याच्या गादीची शस्त्रक्रिया




करण्यात आली आणि उपचारानंतर १५ ऑगस्ट रोजी त्यांना रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला. या उपचारासाठी अंदाजे ४ लाख ५० हजार ते ५ लाख रुपये खर्च अपेक्षित होता. मात्र आयुष्यमान भारत योजनेअंतर्गत संपूर्ण उपचाराचा खर्च झाल्याने केदार कुटुंबावर कोणताही आर्थिक भार पडला नाही. विशेष म्हणजे रुग्णालयातील नोंदणीसाठी भरलेली ५५० रुपयांची फी देखील परत करण्यात आली. त्यामुळे महागडी शस्त्रक्रिया होऊनही सुभाष केदार यांना उपचारासाठी अक्षरशः एक रुपयाही खर्च करावा लागला नाही.

**महाआरोग्य शिबिरातून आणखी दोन रुग्णांवर गुडघा सांधेरोपणाच्या शस्त्रक्रिया**

आमदार सुरेश धस यांच्या पुढाकारातून आयोजित महाआरोग्य शिबिरात निवड झालेल्या आणखी दोन गरजू रुग्णांवर अहिल्यानगर येथील साईदीप सह्याद्री रुग्णालयात गुडघा सांधेरोपणाच्या शस्त्रक्रिया मोफत करण्यात आल्या. आष्टी तालुक्यातील कर्हेवडगाव येथील गोपीनाथ मारुती सानप आणि पाटोदा तालुक्यातील नफरवाडी येथील महादेव नरसिंग चव्हाण यांच्यावर गुडघ्याच्या मोफत शस्त्रक्रिया यशस्वीपणे करण्यात आल्या. साईदीप सह्याद्री रुग्णालयाचे चेअरमन डॉ. दीपक किरण यांच्या सहकार्याने डॉ. नालकर यांनी या शस्त्रक्रिया केल्या. शस्त्रक्रियेनंतर सानप व चव्हाण यांनी आमदार सुरेश धस, डॉ. दीपक किरण, डॉ. नालकर तसेच उपचारासाठी सहकार्य करणाऱ्या सर्वांचे आभार मानले. आता आम्ही पुन्हा स्वतःच्या पायावर उभे राहू शकतो, अशी भावना व्यक्त करत त्यांनी महाआरोग्य शिबिराबद्दल समाधान व्यक्त केले. रुग्णसेवक विकास साळवे व अमर वाळके यांनीही उपचार प्रक्रियेत मदत केली.

### आर्थिकदृष्ट्या दुर्बल रुग्णांसाठी आ.सुरेश धस ठरताहेत आधार

आष्टी विधानसभा मतदारसंघातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल रुग्णांना महागड्या उपचारांसाठी आयुष्यमान भारत योजना, मुख्यमंत्री सहायता निधी तसेच इतर शासकीय योजनांच्या माध्यमातून मदत मिळवून देण्यासाठी आमदार सुरेश धस यांचा पुढाकार महत्त्वपूर्ण ठरत आहे. आष्टीतील महाआरोग्य शिबिरात केवळ तपासणी न करता गंभीर आजार असलेल्या गरजू रुग्णांची निवड करून त्यांच्या पुढील उपचार व शस्त्रक्रियांची व्यवस्था केली जात असल्याने या उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.महाआरोग्य शिबिर हे केवळ एक दिवसाचे शिबिर न राहता गरजू रुग्णांना प्रत्यक्ष उपचार मिळवून देणारे अभियान ठरत आहे, अशी भावना रुग्णांच्या नातेवाईकांकडून व्यक्त होत आहे.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26